अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९० । गुरुवार २३ एप्रिल २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग ३५

## विद्यार्थी आणि सहजयोग

महाराष्ट्राच्या भूमीवर जन्मलेली ही मुलं आहेत. समजून घ्या.. आपल्या मुलांची अशी कवडी किंमत करू नका. ह्या मुलांना साक्षात्कार देऊन, ही अभिनव, ही आपल्यामध्ये जी शक्ती आहे ती जागृत करा. ह्या सर्व शक्त्या आपल्यामध्ये आहेत. जी मुलं वर्गात फार ढ होती. राहुरी शाळेमध्ये तुम्ही जाऊन विचारलंत तर सगळी मुलं फर्स्ट क्लास आहेत. आणखीन इतकेच नव्हे तर स्कॉलरशीपमध्ये सगळे पटाईत आहेत. कारण इथले प्रिन्सिपलचमुळी रियलायझेशनला आले होते. ही इतकी अभिनव एक क्रिया आहे.पण आजच्या ह्या कलीयुगामध्ये एकच गोष्ट आम्ही केली, की जसं ज्ञानेश्वरांनी सामूहिकतेला हे उघडून सांगितलं आहे, तसं सगळ्यांना सामूहिकतेमध्ये जागृती देण्याचं कार्य आम्ही करतो. जोपर्यंत तुमच्यामध्ये अध्यात्माचा पाया येणार नाही, तुम्ही कोणतीही भौतिक प्रगती नाशवंतच होणार. कारण त्याला संतुलन राहणार नाही. भौतिक प्रगतीपासून जे त्रास आहेत ते सांभाळण्यासाठी आधी अध्यात्माचा पाया ठीक करा. नशीबाने सहजयोग आज उद्भवला आहे. त्याने सगळ्यांची जागृती होऊ शकते. कुंडलिनी जागृती होऊ शकते. आणि तुमच्यामध्ये जी अंधश्रद्धा आहे ती समूळ नष्ट होऊ शकते. आम्ही जात-पात मानत नाही. आम्ही विश्वधर्म मानतो. १६/१२/१९९० वाई अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org ८८७१५१९१९१ **सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी**

## महत्त्वाचे..

### चार दिवस वादळी पावसाचा इशारा

पुणे : राज्यात अनेक ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून कडाक्याचं ऊन पडत आहे. असं असलं तरी काही ठिकाणी आता वातावरणात बदल होताना दिसत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण बघायला मिळत आहे. काही ठिकाणी अजूनही कडाक्याचं ऊन पडत आहे. पण हे ऊन कमी होऊन अवकाळी पाऊस बरसण्याची शक्यता आहे. राज्यात पुढील चार दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढच्या पाच दिवसांमध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीटची शक्यता आहे. पुणे हवामान विभागाकडून हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भ, मराठवाड्यात गारपीट होण्याची शक्यता आहे.

# आकारी पडीत शेतकऱ्यांना सिलिंग अ‍ॅक्टप्रमाणे जमिनी मिळणार

## मोजणी करण्याची महसूल मंत्र्यांची ग्वाही

## उर्वरित जमिनीवर उद्योग उभारणार

### मंत्रालयात पार पडली निर्णायक बैठक; १ मे चे आंदोलन स्थगित, ६ मे रोजी मुख्यमंत्र्यांकडे अंतिम प्रस्ताव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई/श्रीरामपूर :** शेती महामंडळाच्या हरेगाव मळ्यातील आकारी पडीत जमिनींचा गेली अनेक दशके प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमिनी सिलिंग अ‍ॅक्टप्रमाणे मोजणी करून एकाच बाजूला मूळ वारसांना दिल्या जातील आणि त्यानंतर उर्वरित जमिनीवरच उद्योगांना जागा दिली जाईल, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिली. अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने मंत्रालयातील या सकारात्मक तोडग्यानंतर शेतकरी संघटनेने १ मे रोजी होणारे 'कब्जा आंदोलन' स्थगित केले आहे.

बैठकीसाठी अ‍ॅड अजित काळे, शेती महामंडळाचे कार्यकारी संचालक अन्य वरिष्ठ अधिकारी, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, याचिकाकर्ते गिरीधर आसने, माजी सभापती तालुकाध्यक्ष दिपक पटारे, डॉ शंकर मुठे, भिमभाऊ बांद्रे, पत्रकार भाऊसाहेब काळे, सरपंच सागर मुठे, सचिन वेताळ, शरद आसने, पोलीस पाटील दत्तात्रय मुठे, अमोल मुठे, जालिंदर मुठे, गोकुळ मुठे यांच्यासह नऊ गावातील शेतकरी **(पान ४ वर)**





# कृषी सेवा केंद्र विक्रेत्यांचा २७ एप्रिल पासून बेमुदत बंद

### प्रलंबित मागण्यांचा शासनाकडून विचार होत नसल्यामुळे उचलले आंदोलनाचे पाऊल

**गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या कृषी निविष्ठा विक्री व्यवसायातील प्रलंबित अडचणी संदर्भात राज्याच्या कृषी विभागाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्यामुळे राज्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी २७ एप्रिल पासून कृषी सेवा केंद्र बेमुदत बंद ठेवण्याबाबत निर्णय घेतला असल्याची माहिती महाराष्ट्र फर्टीलायझर्स डीलर असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री विवेक कासार अहिल्यानगर फर्टीलायझर असोसिएशनचे अध्यक्ष हराळ व राहता तालुका कृषी असोसिएशनचे अध्यक्ष व जिल्हा फर्टीलायझर असोसिएशनचे संचालक कैलास रावसाहेब वर्पे यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या **(पान ४ वर)**

## शिखर बँक घोटाळा प्रकरण

# आ. रोहित पवार आरोपमुक्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससी बँक) या राज्याच्या शिखर सहकारी बँकेकडून कर्जांचे वितरण करताना सुमारे २५ हजार कोटी रुपयांचा कथित घोटाळा झाल्याच्या प्रकरणातून विशेष न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार आणि इतरांना आरोपमुक्त केले आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने (इओडब्ल्यू) दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारे ईडीने मनी लाँड्रिंग प्रकरणात रोहित पवार यांच्यासह अनेकांनाही आरोपी केले होते. मात्र, इओडब्ल्यूचा सी-समरी (क्लोजर रिपोर्ट) अहवाल विशेष एसीबी न्यायालयाने २७ फेब्रुवारी रोजी स्वीकारल्याने तो गुन्हाच अस्तित्वात राहिला नाही. त्यामुळे ईडीचा गुन्हाही कायद्याच्या कसोटीवर टिकत नसल्याचे म्हणणे मांडत आरोपमुक्ती देण्याची विनंती रोहित पवार आणि अन्य आरोपींनी केली होती. अखेर विशेष न्यायालयाने रोहित पवार आणि इतरांची मागणी मान्य केली आहे.



ईओडब्ल्यूने दोन वेळा या प्रकरणात क्लोजर रिपोर्ट दाखल केलेले असतानाही ईडीने मला आरोपी केले आहे. हे निव्वळ मला राजकीयदृष्ट्या लक्ष्य करण्यासाठी करण्यात आले आहे, असा दावा रोहित पवार यांनी आपल्यावरील आरोपांचे खंडन करताना केला होता. ईडीने रोहित पवार यांच्या विरोधात कठोर कारवाई केली होती. विशेष म्हणजे रोहित पवार यांच्या मालकीच्या बारामती अ‍ॅग्रो कंपनीतही २०२३ मध्ये ईडीने **(पान ४ वर)**

# घरात घुसून महिलेवर चाकूचे सपासप वार

## वाळूजमध्ये थरारक हत्याकांड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर येथील वाळूज महानगर परिसरातील बजाजनगरमधील साई श्रद्धा पार्क येथे एका महिलेने दुसऱ्या महिलेची घरात घुसून धारदार शस्त्राने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी शैलजा सोनार या सकाळच्या सुमारास साधना सोनपेठकर यांच्या घरी गेल्या. त्या वेळी साधना आणि त्यांच्या सासूबाई घरात उपस्थित होत्या. घरात प्रवेश करताच आरोपीने आतून कडी लावून घेतली आणि सोबत आणलेल्या पिस्तुलाने साधना यांच्या कपाळावर बंदूक रोखली. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे घरातील वातावरण तणावपूर्ण झाले. मात्र प्रसंगावधान राखत साधना यांच्या सासूबाईंनी धाडस दाखवत आरोपीच्या हातातील पिस्तूल हिसकावून घेत खिडकीतून खाली फेकून दिले. या गोंधळाचा फायदा घेत साधना जीव वाचवण्यासाठी बेडरूममध्ये धाव घेतली.

पिस्तूल हिसकावल्यामुळे संतापलेल्या आरोपी शैलजा सोनार यांनी सासूबाईंवर हल्ला चढवत त्यांचा गळा आवळण्याचा प्रयत्न केला. सासूबाईंना वाचवण्यासाठी साधना पुन्हा हॉलमध्ये आल्या असता आरोपीने चाकूने त्यांच्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात साधना सोनपेठकर यांचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी मोठ्या **(पान ४ वर)**



**दरम्यान, प्राथमिक तपासात मृत साधना सोनपेठकर यांचे पती महेंद्र सोनपेठकर आणि आरोपी शैलजा सोनार यांच्यात संबंध असल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वी शैलजा सोनार यांनी महेंद्र सोनपेठकर यांच्या विरोधात बलात्काराचा गुन्हाही दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर ही हत्या वैयक्तिक वादातून आणि सूडाच्या भावनेतून करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.**






## संपादकीय

# आकारी छळले, आता सिलिंगचा धक्का..!

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील नऊ गावांतील 'आकारी पडीत' जमिनींचा प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून महसूल दरबारी धूळ खात पडला होता. या प्रश्नाने अनेकवेळा आंदोलनाचे स्वरूप धारण केले, पोलीस ठाण्यात चुली पेटल्या आणि जेलभरो आंदोलनापर्यंत मजल गेली. अखेर, मंत्रालयातील महसूल मंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत एक तोडगा समोर आला आहे. मात्र, या तोडग्याचे नीट विश्लेषण केले तर असे लक्षात येते की, शासनाने 'शेतकऱ्यांचे समाधान' आणि 'उद्योगांचे हित' असा दुहेरी साध्य गाठण्याचा प्रयत्न केला आहे. सिलिंग ॲक्टची (कमाल जमीन धारणा कायदा) कात्री लावून शेतकऱ्यांना जमिनी द्यायच्या आणि उर्वरित प्रचंड मोठा भूखंड 'झेडआरटू'सारख्या विमान इंधन प्रकल्पाला बहाल करायचा, असा हा सुवर्णमध्य काढला गेला आहे.

आकारी पडीत जमिनीचा इतिहास हा ब्रिटिशांच्या महसूल पद्धतीशी जोडलेला आहे. १९१८ च्या सुमारास पडलेल्या भीषण दुष्काळामुळे आणि जागतिक मंदीमुळे शेतकरी हवालदिल झाला होता. शेती पिकत नव्हती आणि डोक्यावर इंग्रज सरकारचा शेतसारा (आकार) थकला होता. हा शेतसारा भरू न शकल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सरकारच्या हवाली केल्या किंवा सरकारने त्या 'आकारी पडीत' म्हणून सरकारी दप्तरी जमा केल्या. या जमिनी पुढे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे हस्तांतरित झाल्या. विशेषतः हरेगाव मळा परिसरातील ५७६ मूळ खातेदारांच्या या जमिनी होत्या.

स्वातंत्र्यानंतरही या जमिनीचा ताबा शेती महामंडळाकडेच राहिला. शेतकरी या जमिनींचे मूळ वारसदार असूनही ते आपल्याच हक्काच्या मातीत 'अतिक्रमणदार' किंवा 'मजूर' म्हणून राहिले. न्यायालयीन लढाईत उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला, मात्र प्रशासकीय दिरंगाई आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे हा प्रश्न तसाच रेंगाळत राहिला.

२२ एप्रिलच्या बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले की, जमिनींचे वाटप 'सिलिंग ॲक्ट' प्रमाणे होईल. हे जरी कायद्याला धरून असले, तरी शेतकऱ्यांसाठी हा 'दिलासा' की 'धक्का' असा प्रश्न निर्माण होतो. कमाल जमीन धारणा कायद्यामुळे एका वारसाला ठराविक मर्यादेपेक्षा जास्त जमीन मिळणार नाही. १९१८ मध्ये ज्यांची ५०-१०० एकर जमीन होती, त्यांच्या आजच्या चौथ्या किंवा पाचव्या पिढीतील वारसांना सिलिंगच्या मर्यादेमुळे अत्यल्प जमीन हाती येईल. याचा सरळ फायदा सरकारला होणार आहे. सिलिंगची मर्यादा लावल्यामुळे मोजणीनंतर हजारो एकर जमीन शासनाकडे किंवा शेती महामंडळाकडे शिल्लक राहील. ही तीच जमीन आहे जी 'झेडआरटू' कंपनीच्या विमान इंधन प्रकल्पासाठी प्रस्तावित आहे. म्हणजेच, शेतकऱ्यांच्या मूळ वारसांना 'त्यांचे हक्क दिले' असे सांगून उर्वरित विस्तीर्ण भूखंड उद्योगांसाठी मोकळा करण्याचा हा एक धोरणात्मक 'मास्टरस्ट्रोक' मानला जात आहे.

शेती महामंडळाच्या जमिनींचे वाटप करताना शासनाचे धोरण नेहमीच संमिश्र राहिले आहे. पूर्वीही महामंडळाच्या जमिनींचे वाटप करताना काही जमिनी 'राखीव' ठेवल्या गेल्या. या जमिनी स्थानिक स्वराज्य संस्थांना (नगरपालिका, ग्रामपंचायत) विकासकामांसाठी, क्रीडा संकुलांसाठी किंवा सरकारी कार्यालयांसाठी दिल्या गेल्या. काही जमिनी भाडेतत्त्वावर देण्यात आल्या. आकारी पडीत जमिनींबाबतही सरकार याच जुन्या धोरणाची पुनरावृत्ती करताना दिसत आहे. परंतु, प्रश्न असा उभा राहतो की, ज्या जमिनी अन्यायाने किंवा गरिबीमुळे सरकारजमा झाल्या होत्या, त्या जमिनींवर पहिला हक्क हा त्या मातीतील वारसदारांचा नाही का? जर सरकार उद्योगांना हजारो एकर जमीन देऊ शकते, तर शेतकऱ्यांच्या वारसांना सिलिंगची कात्री न लावता पूर्ण जमीन का दिली जात नाही?

जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या प्रश्नात मध्यस्थी करून मोठी भूमिका बजावली आहे. विखे पाटील यांच्यासमोर दोन आव्हाने होती: एक म्हणजे आपल्या मतदारसंघातील आणि जिल्ह्यातील संतापलेल्या शेतकऱ्याला शांत करणे आणि दुसरे म्हणजे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी 'विमान इंधन प्रकल्पा'सारखा मोठा प्रकल्प जिल्ह्यात टिकवून ठेवणे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याला प्रशासकीय जोड देऊन सरकारची बाजू सुरक्षित केली आहे.

शेतकऱ्यांनी एकाच बाजूला एकत्रित जमिनी घेण्यास संमती दर्शवली आहे, हा या बैठकीतील एक महत्त्वाचा विजय आहे. यामुळे जमिनीचे तुकडीकरण टळेल आणि महामंडळाला उद्योगांसाठी 'मोकळा आणि सलग' भूखंड उपलब्ध होईल. ६ मे रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे हा सुधारित प्रस्ताव जाणार आहे. त्यानंतर राजभवनातील स्वाक्षरीचा अडथळा दूर होऊन या प्रक्रियेला वेग येईल. आकारी पडीत जमिनीचा प्रश्न मार्गी लागणे हे स्वागतार्ह आहे. शेतकऱ्यांनी १ मे चे आंदोलन स्थगित केले, कारण त्यांना आशा दिसली आहे. परंतु, ही आशा 'झेडआरटू' प्रकल्पाच्या इंधनावर आधारित नसावी. उद्योगांमुळे रोजगार निर्माण होतो, हे मान्य असले तरी तो विकास शेतकऱ्यांच्या बलिदानावर उभारला जाऊ नये. सरकारने ''शेतकऱ्यांच्या हक्कावर गदा येणार नाही'' असे आश्वासन दिले आहे, मात्र सिलिंग ॲक्टमुळे मिळणारी अत्यल्प जमीन आणि बाजूलाच उभा राहणारा मोठा प्रकल्प यामुळे भविष्यात सामाजिक विषमता निर्माण होण्याची भीती नाकारता येत नाही. शेवटी, आकारी पडीत जमिनीचा हा लढा केवळ जमिनीच्या तुकड्यासाठी नव्हता, तर तो ऐतिहासिक अन्यायाविरुद्धचा होता. हा अन्याय दूर करताना सरकार 'व्यापारी' भूमिकेतून पाहणार की 'लोककल्याणकारी' भूमिकेतून, हे येणारा काळच ठरवेल. तूर्तास, ६ मे च्या मंत्रिमंडळ निर्णयाकडे साऱ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

# अफवांचा कहर; चोरांच्या संदेशांनी गावोगावी भीतीचे सावट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** राहुरी तालुक्यातील धानोरे, सोनगाव, सात्रळ व राहाता तालुक्यातील हनुमंतगाव आणि पाथरे परिसरात मंगळवारी उशिरा रात्री सोशल मीडियावर पसरलेल्या चोरांच्या अफवांनी ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. कोणतीही अधिकृत घटना घडलेली नसतानाही व्हॉट्सॲप संदेशांच्या जोरावर गावोगावी नागरिकांनी रात्रभर गस्त घालत जागरण केले.

गावात चोर शिरले, संशयित टोळी फिरत आहे अशा आशयाचे संदेश विविध व्हॉट्सॲप गटांवर वेगाने प्रसारित झाले. काहींनी ऑडिओ व व्हिडीओ शेअर करत चोरांना पाहिल्याचा दावा केल्याने वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले. परिणामी अनेक नागरिक घराबाहेर पडत शेजाऱ्यांना सतर्क करू लागले. काही ठिकाणी ग्रामस्थांनी एकत्र येत काठ्या, टॉर्चच्या साहाय्याने गस्त सुरू केली.

या दरम्यान काहींनी पोलिसांना संपर्क साधल्याचे सांगितले, तर काही संदेशांमध्ये



पोलीस घटनास्थळी दाखल झाले अशी माहिती देण्यात आली. तथापि, प्रत्यक्षात कुठेही चोरी किंवा संशयास्पद हालचालींची अधिकृत नोंद झालेली नसल्याचे समजते. अफवांचा परिणाम महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांवर दिसून आला. अनेकांनी भीतीपोटी संपूर्ण रात्र घराबाहेर पहारा दिला, तर काहींनी मुलांना घरातच सुरक्षित ठेवण्याचे आवाहन केले. गावागावांत सावधतेचे संदेश देत नागरिकांनी एकमेकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला.दरम्यान, काही सुजाण नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. अप्रमाणित माहिती पुढे पाठविणे टाळावे, तसेच कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास थेट पोलिसांशी संपर्क साधावा, असे त्यांनी नमूद केले.सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरलेल्या या अफवांनी ग्रामीण भागातील संवेदनशीलता पुन्हा अधोरेखित केली आहे. वस्तुस्थितीची खात्री न करता संदेश प्रसारित केल्यास त्यातून अनावश्यक भीती आणि गोंधळ निर्माण होऊ शकतो, हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

# धक्काबुक्कीच्या निषेधार्थ कोपरगाव नगरपरिषदेच्या सभेवर राष्ट्रवादीचा बहिष्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** सुभद्रानगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर सभामंडपाच्या भूमिपूजनावेळी झालेल्या धक्काबुक्कीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने बुधवारी (दि.२२) कोपरगाव नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेवर बहिष्कार टाकला. सत्ताधाऱ्यांच्या वर्तनावर तीव्र नाराजी व्यक्त करत हा निर्णय घेण्यात आला.

रविवारी (दि.१९) झालेल्या भूमिपूजन कार्यक्रमात राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना गुंडांच्या माध्यमातून धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे मंदिरासाठी जागा देणारे माजी नगरसेविका यांचे पती व राष्ट्रवादीचे ज्येष्ठ पदाधिकारी बाळासाहेब आढाव यांनाही या



प्रकाराला सामोरे जावे लागल्याने संताप व्यक्त होत आहे.

राष्ट्रवादीच्या गटनेत्या गौरी पहाडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखालील विकास कामांना आमचा पाठिंबा कायम राहील. मात्र नागरिकांना त्रास देणाऱ्या आणि शहराची शांतता भंग करणाऱ्या कोणत्याही कृतीला पाठिंबा दिला जाणार नाही. सत्ताधाऱ्यांनी श्रेयवादापेक्षा विकासाला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पदाधिकारी सुनील गंगुले यांनीही सत्ताधाऱ्यांवर टीका करत विकासकामांमध्ये अडथळे निर्माण केल्याचा आरोप केला. आमदार काळे यांच्या प्रयत्नातून शहरातील पाणीप्रश्न मार्गी लागला असून विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध झाला आहे. मात्र विरोधकांकडून अपप्रचार करून वातावरण बिघडवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सर्वसाधारण सभेत पत्रकारांना प्रवेश नाकारण्यात आल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना दूर ठेवून निर्णय घेतले जात असल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची टीका नगरसेवक मेहमूद सय्यद यांनी केली.

या पत्रकार परिषदेस राष्ट्रवादीचे नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. बाळासाहेब गाडेकर यांना 'समाजभूषण' पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक बाळासाहेब रामनाथ गाडेकर यांना 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राहता येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने प्रदान करण्यात आला. जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. शिर्डी येथील साईयोग फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. योग शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, गुणवंत विद्यार्थी सन्मान अशा अनेक उपक्रमांमध्ये प्रा. गाडेकर यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, रक्तदान शिबिर, ग्रामस्वच्छता आणि सामाजिक जनजागृती कार्यक्रमांमध्येही त्यांनी गेल्या २४ वर्षांपासून उल्लेखनीय योगदान दिले आहे. प्रा. गाडेकर हे त्यांचे वडील कै. रामातात्या गाडेकर यांच्या सामाजिक कार्याचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच त्यांना 'समाजभूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले.



# संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा आरोग्य जनजागृतीसाठी स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेज, भानसहिवरे येथील विद्यार्थ्यांनी बी.एड. अभ्यासक्रमांतर्गत श्रीरामपूर तालुक्यातील अशोकनगर येथील श्रीमती जानकीबाई आदिक विद्यालयात आरोग्य विषयक मार्गदर्शन व आरोग्य तपासणी हा उपक्रम उत्साहात राबविला. या उपक्रमादरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र, निपाणी वडगाव येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रतिमा गोर्डे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य व शिक्षण यांचा समतोल कसा राखावा, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील आरोग्यदायी सवयींचे महत्त्व पटवून दिले. तसेच उपस्थित पालकांनाही विद्यार्थ्यांच्या आरोग्य व दिनक्रमात सुधारणा कशी करता येईल, यावर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांसह पालकांची विविध आरोग्य तपासणीही करण्यात आली. डॉ. गोर्डे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही तपासणी करून आरोग्याबाबत आवश्यक सूचना दिल्या. कार्यक्रमाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सिंधू आदिक यांनी संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेज व छात्रअध्यापकांचे मनापासून कौतुक केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल थोरात यांनी केले, सूत्रसंचालन गणेश सोलट यांनी केले तर आभार प्रदर्शन सोमेश्वर कोतकर यांनी व्यक्त केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी गटप्रमुख प्रशांत धंदक, प्रसाद मुंडलिक, आतिश ठोकळ, योगेश बोठे, अलिशा सुतार, वैशाली ठोंबरे, तृप्ती म्हस्के, सुजाता घाडगे, पूजा आढाव, ऐश्वर्या सोनवणे, फिजा पटेल, पूजा खेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

बेल्हेकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश पाटील बेल्हेकर व डॉ. सौ. रंजनाताई बेल्हेकर यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच या उपक्रमासाठी प्राचार्या श्रीमती स्वाती गव्हाणे, प्रा. मनिषा भोईटे व प्रा. शेखर जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होत असून समाजाशी नाते अधिक दृढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# पानोडीत श्री साईबाबा मंदिर जीर्णोद्धार व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील मुंढे वस्तीवर श्री साईबाबा मंदिराचा जीर्णोद्धार व भव्य मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. येत्या २४ एप्रिल ते २६ एप्रिल २०२६ या कालावधीत हा मंगलमय सोहळा आयोजित करण्यात आला असून, यानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.





कुलदैवत श्री खंडोबा महाराज आणि श्री रेणुका माता यांच्या आशीर्वादाने आयोजित या सोहळ्याची जय्यत तयारी सध्या मुंढे वस्ती परिसरात सुरू आहे.

सोहळ्याच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी सकाळी ९ ते १२ या वेळेत श्री साईबाबांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि 'साई'च्या जयघोषात संपूर्ण गाव दुमदुमून निघणार आहे.

दुसऱ्या दिवशी, शनिवारी सकाळी ९ ते ५ या वेळेत विधीवत मंत्रोच्चारात श्री साईबाबांच्या मूर्तीची मंदिरात प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. या धार्मिक विधीसाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

सोहळ्याची सांगता रविवारी भव्य कीर्तनाने होईल. दुपारी ५ ते रात्री ९ या वेळेत प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. अक्रोड महाराज साखरे (बीडकर) यांचे जाहीर हरिकीर्तन संपन्न होईल. महाराजांच्या रसाळ वाणीतून होणाऱ्या या कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी उपस्थित राहावे, असे रंगन्नाथ अनुरथ मुंढे , पंढरीनाथ अनुरथ मुंढे , ज्ञानेश्वर गोरक्षनाथ मुंढे , महेश पंढरीनाथ मुंढे , साहिल रंगन्नाथ मुंढे , यांनी आवाहन केले आहे. कीर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे .

# टाकळीभान यात्रा कुस्तीचा फडात शाळकरी मुले

## मुलींच्या कुस्त्या ठरल्या आकर्षण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** ग्रामदैवत असलेल्या शंभु महादेवाचा यात्रा उत्सव अक्षय तृतियेनंतर येणाऱ्या सोमवारी साजरा करण्याची प्रथा रुढ आहे. त्यामुळे २० व २१ एप्रिल रोजी पार पडलेल्या या यात्रा उत्सवात लहान लहान मुलांनी कुस्तीचा फड गाजवला मुलांबरोबरच मुलीही आता कुस्तीच्या फडात उतरण्यास सुरुवात झाली आहे दोन तरुण शाळकरी मुलींच्या कुस्तीने सर्व कुस्तीप्रेमी आकर्षित झाले.

टाकळीभान परीसराचे ग्रामदैवत आसलेल्या शंभु महादेवाचा यात्रा महोत्सव गेल्या अनेक वर्षांपासुन भव्य स्वरुपात साजरा केला जातो.गंगाजल मिरवणुक, लघु रुद्राभिषेक, झेंडा मिरवणुक, छबीना मिरवणुक, शोभेच्या दारुची आताषबाजी, लोकनाट्य, कलाकारांच्या हजर्या, कुस्त्यांचा जंगी हगामा, आर्केस्ट्रा अशा विविध कार्यक्रमांची दोन



दिवस रेलचेल आसते. त्यामुळे यंदा उन्हाची तिव्रता जास्त आसतानाही माहेरवासिनी, पै. पाहुणे व परीसरातील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने यात्रेत हजेरी लावल्याने गर्दीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला. लोकनाट्याच्या कलाकारांनी सादर केलेल्या अदाकारीला प्रेक्षकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. कुस्तीच्या फडात नामवंत मल्लांसह महीला कुस्तीगिरांचीही उपस्थिती लक्षवेधी होती.

त्यामुळे सुमारे तीन तासांपेक्षा जादा वेळ कुस्त्यांचा फड सुरु होता. मंगळवारी सायंकाळी सादर झालेल्या आर्केस्ट्राच्या कार्यक्रमाला नेहमीप्रमाणे महीलांची उपस्थिती लक्षणीय होती. आर्केस्ट्राच्या कलाकारांनीही उत्तम सादरीकरण केल्याने अनेक गितांना प्रेक्षकांकडुन '' वन्स मोअर '' मिळत होता. दोन दिवस सुरु आसलेल्या यात्रा महोत्सवासाठी अप्पर पोलिस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागिय पोलीस आधिकारी जयदत्त भवर, तालुका पोलिस ठाण्याचे पो.नि. अरुण धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पी एस आय सतीश डवले , पी एस आय दिलीप मंडलिक , पो हे कॉ कुमार बैसने, नवनाथ बर्डे , राजू त्रिभुवन, यांनी दोन दिवस चोख बंदोबस्त व टवाळखोरांवर बारीक नजर ठेवल्याने यात्रौत्सव शांततेत पार पडण्यास मदत झाली.

यात्रा कमेटीची गेल्या महीण्याभरापासुन यात्रौत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी सुयोग्य नियोजन केले होते. यात्रौत्सवासाठी सहकार्य करणारे ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य, दोन दिवस मोफत जारचे थंड पाणी देणारे रावसाहेब आहेर, वर्गणीदार, तरुण मंडळ, जेष्ठ नागरीक, ग्रामदैवताच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी स्थानिक पत्रकार नेहमीच सहकार्य करीत आसल्याने यात्रा समितीच्या वतीने पत्रकारांचे विषेश आभार यावेळी मानले.


# सोमय्याचे राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत १३१ विद्यार्थी चमकले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** लक्ष्यवेध प्रज्ञाशोध नंतर एस.के. सोमय्या प्रा. विद्या मंदिरचे राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्ह्यात ९ , केंद्रात १२२ विद्यार्थी असे एकूण १३१ विद्यार्थ्यांनी स्थान पटकावले आहे. जिल्हा गुणवत्ता यादीतील ९ विद्यार्थी पुढील प्रमाणे इयत्ता दुसरी - कैवल्य पवार -१३४ गुण जिल्ह्यात ४ था ,इयत्ता तिसरी- अथर्व ठाकरे - २८६ गुण जिल्ह्यात २ रा ,रुपनर राजवीर -२८४ गुण जिल्ह्यात ३ रा , रणवीजय बैसाणे २८४ गुण जिल्ह्यात ३ री , अभिज्ञा फुटाणे २८० गुण जिल्ह्यात पाचवी, इयत्ता चौथी -विराट पाटील व अर्णव रणसिंग २८६ गुण जिल्ह्यात ३ रा क्रमांक, श्रीशैल्य मुठे -२८२ गुण जिल्ह्यात ५ वा इ . ५ वी - मनस्वी कोबरणे २८६ गुण जिल्ह्यात - २ री या सर्व यशवंत , गुणवंत विद्यार्थीचे प्रेरणास्थान मॅनेजिंग कौन्सिल सदस्यां मीनाताई जगधने व मुख्याध्यापक सोनाली पैठणे व स्पर्धा परीक्षा प्रमुख अनिता चेडे आदींचे या विद्यार्थ्यांचे सर्वत्र पालक व शिक्षक वृंदांकडून अभिनंदन होत आहे.









# तांभेरे येथे विद्यार्थ्यांचा स्वागत व निरोप समारंभ उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठ :** राहुरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सहकार वस्ती (तांभेरे) येथे इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत तसेच इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमात विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चांगदेव तात्या मुसमाडे होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून कोल्हार येथील सामाजिक कार्यकर्त्या गिताताई गुंड उपस्थित होत्या. मुख्याध्यापक संतोष डगळे यांनी प्रास्ताविक करत कार्यक्रमाची रूपरेषा मांडली.

यावेळी इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी पहिली ते चौथीपर्यंतच्या शालेय प्रवासातील अनुभव मनोगताच्या स्वरूपात मांडले. त्यानंतर इयत्ता पहिली ते तिसरीतील विद्यार्थ्यांनी आपल्या ओघवत्या वाणीने चौथीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कोणतेही लिखित भाषण न करता विद्यार्थ्यांनी केलेल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. ग्रामस्थांच्या वतीने माजी उपसरपंच कचरू नाना मुसमाडे व संकेत शिरसाठ यांनी मनोगत व्यक्त केले. इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या चार विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले, तर चौथीतील सहा विद्यार्थ्यांना रायटिंग पॅड व पुष्प देऊन निरोप देण्यात आला.

प्रमुख पाहुण्या गुंड यांनी जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व अधोरेखित करत, या शाळा संस्कार देणाऱ्या संस्था असल्याचे सांगितले. वर्गशिक्षक विजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या आठवणी सांगत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शनही त्यांनी केले.

कार्यक्रमानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. भोजन व्यवस्था मनिषा मुसमाडे व मंगल मुसमाडे यांनी केली. तसेच ग्रामस्थ व विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी आर्थिक मदत देण्यात आली. गिताताई गुंड यांनी ११०० रुपये, रावसाहेब शिरसाठ यांनी ५०० रुपये, तर इतर विद्यार्थ्यांनीही योगदान दिले. गुलाब पुष्पांची व्यवस्था प्रमोद मुसमाडे यांनी केली.

या कार्यक्रमासाठी मच्छिंद्र मुसमाडे, गेनूजी मुसमाडे, सखाहरी मुसमाडे, रावसाहेब शिरसाठ, संजय गागरे, गोरक्षनाथ मुसमाडे, अमोल मुसमाडे, जालिंदर मुसमाडे, सुरेश गागरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### ज्ञानेश्वर थोटे यांना राज्यस्तरीय कलारत्न पुरस्कार प्रदान



**नेवासा** : अभिनयाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल नेवासा येथील हरहुन्नरी कलाकार ज्ञानेश्वर थोटे यांना नाशिक येथे अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात २०२६सालच्या मानाच्या राज्यस्तरीय कलावंत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा गौरव सोहळा कलावंत विचार मंच, कमल फिल्म प्रोडक्शन आणि कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाचे नियोजन स्वागताध्यक्ष सुनील मोंढे सर यांनी केले होते. ज्ञानेश्वर थोटे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार अहिल्यानगरचे ज्येष्ठ साहित्यिक, सुप्रसिद्ध व्याख्याते, माजी पोलीस अधिकारी सुभाषजी सोनवणे सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. याप्रसंगी व्यासपीठावर विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची उपस्थिती लाभली होती. ज्ञानेश्वर थोटे यांनी कलाक्षेत्रात विशेषत: वेब सिरीज, लघुपट, चित्रपट या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच त्यांची जिद्द , चिकाटी आणि कष्टाची दखल घेऊनच या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

### गोदावरी पात्रातील बेकायदा वाळू उपशाविरोधात धडक आंदोलनाचा इशारा

**पुणतांबा** : गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बेकायदा वाळू उपशाविरोधात परिसरातील ग्रामस्थ आक्रमक झाले असून, महसूल विभागाने तातडीने कारवाई न केल्यास येत्या १ मे महाराष्ट्र दिनी धडक आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत भास्कर मोटकर यांच्यासह ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. निवेदनात म्हटले आहे की, गोदावरी नदीपात्रातील वाळूचा अधिकृत लिलाव झालेला नसतानाही सध्या रात्रंदिवस विना नंबरच्या डंपरद्वारे तसेच १०, १२ व १४ टायरच्या अवजड वाहनांद्वारे पिंपळवाडी चौक, रामपूरवाडी, जळगाव मार्गे खुलेआम बेकायदा वाळूची वाहतूक सुरू आहे. या अवजड वाहनांमुळे पुणतांबा गावाला जोडणारे रस्ते उखडले असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे या वाहनांवर अल्पवयीन मुलांना चालक म्हणून कामाला लावले जात असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. याशिवाय रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वाहतुकीमुळे वाहनांच्या कर्कश आवाजाने ग्रामस्थांची झोप उडाली असून, नागरिकांना रात्र जागून काढावी लागत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. बेकायदा वाळू, माती व मुरूम उपसा आणि वाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी, अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा भास्कर मोटकर यांनी दिला आहे.

### स्वच्छता अभियानातून प्रवरा कृषि संस्थेचा प्लास्टिकमुक्त परिसराचा संदेश

**प्रवरानगर** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषि शास्त्र संस्थेने महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता अभियान राबवून प्लास्टिकमुक्त परिसर हा महत्त्वपूर्ण संदेश दिला. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आणि कृषि संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत संपूर्ण महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली. परिसरातील प्लास्टिक व इतर कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अमोल खडके, कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे आणि कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष वर्पे यांनी विद्यार्थ्यांना परिसर कायमस्वरूपी प्लास्टिकमुक्त ठेवण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी आणि ते शिक्षणाबरोबरच सामाजिक कार्यातही पुढे असावेत, या उद्देशाने संस्थेमार्फत विविध उपक्रम राबवले जातात. आम्ही कचरा करणार नाही, तुम्हीही करू नका हा संदेश देत विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. याचबरोबर त्यांनी फळझाडांना पालापाचोळ्याचे आच्छादन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण गायकर यांनी केले. हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रा. संदीप पठारे, प्रा. प्रदीप मखरे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# लवांडेच्या वक्तव्यावर निषेध मोर्चा

## वारकरी संप्रदाय ही वैदिक धर्माचीच सुधारित शाखा..

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : संत ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी नेवासा येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील लवांडे नामक व्यक्तीने संतांबद्दल केलेल्या घुसखोरी या वक्तव्याचा बुधवारी दि.२२ एप्रिल रोजी संत महंत वारकऱ्यांसह सकल हिंदू समाजाच्या वतीने मोर्चा काढून निषेध व्यक्त करण्यात आला. वारकरी संप्रदाय ही वैदिक धर्माचीच एक सुधारित शाखा असून धर्मामध्ये फूट पाडण्यासाठीच अशी वक्तव्ये करण्याचा प्रयत्न होत असल्याचे प्रतिपादन वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी यावेळी बोलतांना केले.




नेवासा येथे लवांडेच्या वक्तव्यावर संत महंतासह वारकऱ्यांचा निषेध मोर्चा काढण्यात आला यावेळी तहसीलदार डॉ.संजय बिरादार व पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना निवेदन देतांना सर्व संत मंडळी व सकल हिंदू समाज बांधव दिसत आहे. **(छाया : सुधीर चव्हाण नेवासा)**

नेवासा येथील श्रीरामपूर रोडवर असलेल्या श्री खोलेश्वर गणपती मंदिर चौकापासून निषेध मोर्चाला सायंकाळी ५ वाजता प्रारंभ झाला. सदरच्या निषेध मोर्चामध्ये संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त देविदास महाराज म्हस्के शास्त्री, सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर,त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज,गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमाचे महंत भगवान महाराज जंगले शास्त्री, मध्यमेश्वर देवस्थानचे महंत ऋषिनाथ महाराज, शिनाई देवस्थानचे महंत आवेराज महाराज, खडेश्वरी देवस्थानचे प्रमुख महंत गणेशानंदगिरी महाराज, घोगरगाव येथील बहिरा जातवेद संस्थानचे महंत बालब्रम्हचारी विश्वनाथ महाराज, देवगड संस्थानचे सेवेकरी बाळू महाराज कानडे, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्यासह वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी, कीर्तनकार, सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. सदरच्या निषेध मोर्चात हजारो वारकऱ्यांनी रामकृष्ण हरि... जय जय रामकृष्ण हरि..असा नामघोष केला. सदरचा मोर्चा श्री खोलेश्वर गणपती चौक, नगरपंचायत चौक, डॉ.हेडगेवार चौक, छत्रपती संभाजी चौक, औदुंबर चौक मार्गे श्रीरामपूर रस्त्यावरून नेवासा तहसीलदार कचेरी प्रांगणात गेला. यावेळी सर्व संत महंतांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख व विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी सर्व संत महंतांच्या वतीने बोलतांना हरी भक्त परायण श्री देविदास महाराज म्हस्के शास्त्री म्हणाले संतांनी वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसारासाठी आपले आयुष्य वेचले, ज्या संतांनी समाजाची जडणघडण केली अशा संतावर ते घुसखोरी व हिंसेला प्राधान्य देतात अशी वक्तव्ये सदर व्यक्तीकडून करण्यात आली. घुसखोर म्हणण्याच्या यांना अधिकार काय? याबाबत जे काही निर्णय घेतील ते आमच्या वारकरी संप्रदायातील आचार्य ठरवतील,याविषयी ज्यांना ज्ञान नाही त्यांनी वारकरी संप्रदायाविषयी बोलू नये असा सल्ला देखील त्यांनी वक्तव्ये करणाऱ्याला दिला.

यावेळी झालेल्या मोर्चाच्या प्रसंगी तहसीलदार डॉ.संजय बिरादार व पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना निवेदन देण्यात आले.संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने मोर्चाची शांततेत सांगता करण्यात आली. वारकरी संप्रदाय व संप्रदाय, समस्त हिंदू समाज नेवासा तालुका यांच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.सदरचा मोर्चा हा शांततेत पार पडला. महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांनी मोर्चात सहभागी झालेल्या वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी,सेवेकरी व सकल हिंदू बांधवांचे आभार मानले.

## उन्हाच्या गरम झळाया असह्य; मठ्ठा लस्सी आम्रखंडाला मागणी

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**



**बेलापूर** : दुपारच्या वेळी पंख्याद्वारे येणारी हवा देखील गरम वाटू लागली आहे. शरीराला गारवा मिळावा यासाठी दुपारच्या जेवणात आम्रखंड श्रीखंड ताक लस्सी मठ्ठा यांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. दुपारच्या वेळेस उन्हात जीव अत्यंत कासावीस होत असून जेवणाबरोबर असलेल्या अनेक भाज्या बेचव वाटू लागल्या आहेत. श्रीखंड आम्रखंड कैरी ताक आणि मठ्ठा जेवणात मोठ्या प्रमाणात वापरला जाऊ लागला आहे. घरात सर्वत्र पंखे चालू असले तरी निघणारी हवा उष्ण निघत आहेत. एसी शिवाय दिवसा आणि रात्री झोप येत नाही. उन्हाळ्यात लहान बाळांना मात्र एसी मध्येच झोपवावे लागत आहे. गल्लोगल्ली दुपारच्या वेळेस उसाच्या रसाच्या फिरणाऱ्या रिक्षा देखील आता बंद आहेत. प्रशासनाने केलेल्या आवाहनाला सर्वत्र आणि सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

सायंकाळी पाच वाजल्यानंतरच घराघरातून शहराच्या मुख्य पेठेत काही खरेदी करण्यासाठी कुटुंबे बाहेर पडत आहेत. सध्या सर्वत्र लग्नसराईचे दिवस आहेत. पर्याय नाही म्हणून लग्नाला जावे लागत असल्यामुळे अनेकांच्या अंगाला काटा येत आहे. सर्वत्र सध्या लग्नतीत दाट आहे. लग्नांमध्ये सर्वत्र इतर कोणत्याही मेनूपेक्षा मठ्ठा हा आवर्जून दिसत आहे. जेवणाच्या पंगतीत सर्वाधिक वाढपी हे मठ्ठा देताना दिसत आहेत. तसेच अनेकांची पसंती ही मठ्ठ्यालाच असल्याने इतर मेनू मात्र तसेच पडून राहत असल्याचे विवाह सोहळ्यातील चित्र दिसत आहे.

श्रीरामपूर शहर आणि तालुक्यातील गावांमध्ये ३८ ते ४० अंश सेल्सिअस अशा प्रमाणात तापमान होते. काही प्रमाणात वाऱ्याची झुळूक येत असली तरी ती उष्ण स्वरूपाची होती. घराघरात असलेले पंखे दिवस आणि रात्र चालू असल्याचे चित्र आहे. तर काही ठिकाणी घरात असलेल्या एसीचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला आहे. काहीसे ढगाळ हवामान असल्यामुळे उष्णतेचा फारसा गंभीर परिणाम जाणवत नसला तरी काळजी म्हणून प्रत्येक जण या उन्हाच्या काहीही पासून स्वतःची जपवणूक करीत आहे.

## लोहार समाजाच्या विकासासाठी ऐतिहासिक पाऊल; ३२ मागण्यांचे निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून लोहार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या ब्रह्मलीन आचार्य दिव्यानंदपुरी महाराज आर्थिक विकास महामंडळ या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे राज्यभरातील लोहार समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच समाजाच्या विविध प्रश्नांना अधोरेखित करण्यासाठी मुंबईत भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. लोहार समाज राज्यस्तरीय समन्वय समिती व विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता दादर (पूर्व) येथील वसंतस्मृती, भारतीय जनता पक्ष कार्यालयात पार पडणार आहे. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, त्यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मान्यवर मंत्री व नेते उपस्थित राहणार आहेत.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे. कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे लोहार समाजाच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या ३२ महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन मंत्रिमंडळास सादर करण्यात येणार आहे. शिक्षण, रोजगार, उद्योग, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय या विविध क्षेत्रांतील प्रश्नांचा या



मागण्यांमध्ये समावेश आहे. नव्याने स्थापन झालेल्या आर्थिक विकास महामंडळामुळे समाजातील युवकांना स्वावलंबनाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्यभरातून लोहार समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. समाजाची एकजूट आणि संघटित शक्ती दर्शवणारा हा कार्यक्रम भविष्यातील विकासाचा मार्ग निश्चित करणारा ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास समाजातील सर्व बंधू-भगिनींनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वय समितीचे अध्यक्ष दिलीप वसव लोहार, उपाध्यक्ष अंकुश थोरात, सचिव युवराज जाधव व कार्याध्यक्ष संजय कोलंबकर यांनी केले आहे.

## टँकरमुक्त तालुका करण्यासाठी कटिबद्ध : आ. खताळ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : सर्वसामान्य जनतेने माझ्यावर दाखवलेला विश्वास आणि मिळालेली साथ हीच माझी सर्वात मोठी ताकद आहे. त्या ताकदीच्या जोरावर पठार भागासह संपूर्ण तालुक्यातील प्रत्येक गावाचा पाण्याचा प्रश्न सोडवण्या साठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मी कटिबद्ध आहोत.

लाडक्या बहिणींच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा खाली उतरवण्यासाठी टँकरमुक्त संगमनेर तालुका करणार, असल्याचा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी केले. संगमनेर तालुक्यातील पिंपळगाव देपा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्रावण महाराज जगताप यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

> पिंपळगाव देपा हे गाव अकोले विधानसभा मतदारसंघात येत असले तरी मतदारसंघाचा भेद न करता आपण संपूर्ण तालुका म्हणून काम करत आहोत. तालुक्यातील जनतेने माझ्यावर भरभरून प्रेम केले आहे. ग्रामस्थांकडून विकासकामांबाबत जे प्रश्न व मागण्या येतील, त्या पूर्ण करण्यासाठी माझा शंभर टक्के प्रयत्न राहील.
>
> **अमोल खताळ (आमदार)**

यावेळी भाविकांना मार्गदर्शन करताना आमदार खताळ बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, तालुक्यातील मायबाप जनतेने परमेश्वराच्या कृपेने माझी लोक प्रतिनिधी म्हणून निवड केली आहे.

राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे जलसंपदा विभाग असल्यामुळे या भागातील पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचाही प्रश्न सोडवण्याचे पुण्याचे काम माझ्या हातून होईल, याची मला खात्री आहे. त्यामुळे जोपर्यंत पाण्याचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत मी शांत बसणार आपणास त्याचा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी दिला.

## गोंडेगाव-चितळी मार्गावरील निकृष्ट रस्त्याविरोधात आमरण उपोषण

### तिसऱ्या दिवशी तांबे यांची प्रकृती खालावली




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : राहाता तालुक्यातील चितळी ते श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगाव या मार्गावरील रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या आरोपावरून गोंडेगाव येथे सुरू असलेल्या बेमुदत आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस असून, उपोषणकर्ते अमोल तांबे यांची प्रकृती खालावल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गोंडेगाव येथील हनुमान मंदिरात डॉ. सुजयदादा विखे पाटील युवा मंचचे अध्यक्ष अमोल तांबे यांनी सोमवार (दि. २० एप्रिल) पासून उपोषणास सुरुवात केली आहे. रस्त्याच्या कामात मोठा अपहार झाल्याची शक्यता व्यक्त करत ग्रामस्थांनी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेतल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात आला.

आज (दि. २२ एप्रिल) उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी गोंडेगाव ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी अमोल तांबे यांची तपासणी केली. शुगर लेव्हल कमी झाल्याने त्यांची प्रकृती खालावलेली दिसून आली. तरीही संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींनी अद्याप भेट दिली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आर्थिक संकल्प २०२२-२३ अंतर्गत माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या प्रयत्नातून चितळी-गोंडेगाव रस्त्यासाठी ३ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. सुमारे तीन महिन्यांपूर्वी कामाला सुरुवात झाली; मात्र सुरुवातीपासूनच कामाच्या दर्जाबाबत ग्रामस्थांनी आक्षेप नोंदवले होते. ठेकेदाराने या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप असून, अंदाजपत्रक व तांत्रिक माहितीही नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. ६ एप्रिल रोजी निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्याने ग्रामस्थांमध्ये संताप वाढला आहे.

कोट्यवधी रुपयांचे काम नियमबाह्य पद्धतीने होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ठेकेदाराला निकृष्ट काम करण्याचे अभय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, उपोषणादरम्यान काही अनुचित घडल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा अमोल तांबे यांनी दिला आहे. या आंदोलनाला चितळी व गोंडेगाव परिसरातील ग्रामस्थांचा मोठा पाठिंबा मिळत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# पोटनिवडणुकीची रणधुमाळी

## सात्रळ-सोनगाव-धानोरेत पोलिसांचा दमदार 'फ्लॅग मार्च'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची रणधुमाळी रंगात आली असताना संपूर्ण तालुक्यात राजकीय वातावरण तापले आहे. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कडक पावले उचलत आपली सज्जता दाखवून दिली आहे. मंगळवारी सायंकाळी सात्रळ, सोनगाव आणि धानोरे या गावांमध्ये पोलिसांनी काढलेल्या दमदार पथसंचलनाने परिसरात पोलिसी धाक निर्माण करत नागरिकांना सुरक्षिततेचा ठाम संदेश दिला.

राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संवेदनशील मानल्या जाणाऱ्या या भागांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या पथसंचलनाची सुरुवात जुन्या बाजारपेठ परिसरातून झाली. त्यानंतर सात्रळ येथील खंडोबा मंदिर चौकापर्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मार्च काढण्यात आला. प्रमुख रस्त्यांवरून निघालेल्या या संचलनामुळे गावातील वातावरण काही काळासाठी पोलिसांच्या उपस्थितीने भारावून गेले.



बंदोबस्ताची ही ताकद पाहून नागरिकांमध्ये एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला, तर संभाव्य गैरप्रकार करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

या पथसंचलनात स्थानिक पोलीस दलासोबतच केंद्रीय सुरक्षा दलांचीही मोठी फौज सहभागी झाली होती. सीआयएसएफ व सीआरपीएफच्या अधिकाऱ्यांसह जवानांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संचलन करत कायद्यापुढे कोणीही मोठे नाही हा ठाम संदेश दिला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार सहन केला जाणार नाही, असा इशाराच यामधून देण्यात आला. पोलीस निरीक्षक वाघमारे, सूरज गायकवाड, देविदास कोकाटे, रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पथसंचलन पार पडले. दरम्यान, या पथसंचलनाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या दमदार 'फ्लॅग मार्च'मुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा कडक संदेश स्पष्टपणे जनतेपर्यंत पोहोचला आहे.

## पान १ वरुन

### कृषी सेवा केंद्र विक्रेत्यांचा २७ एप्रिल पासून बेमुदत बंद

निवेदनात दिली आहे. कंपन्यांकडून रासायनिक खताचा पुरवठा होताना होणारे लिंकिंग बंद करावे, शेजारील राज्यातून येणाऱ्या अप्रमानीत ्रूढइढकापूस बियाणांवर बंदी आणावी, प्रमाणित बियांना संबंधी साठी पोर्टलचा वापर विक्रेत्यावर सक्ती न करता उत्पादक व पुरवठादार कंपनी स्तरावरच राबवला जावा, रासायनिक खताचा पुरवठा (ऋजठ) पद्धतीने करावा, विक्रेते बियाणे पुरवठादार कंपन्याकडून सीलबंद पॅकिंग मध्ये खरेदी करून शेतकऱ्यांना त्याच पॅकिंग मध्ये विक्री करीत असल्यामुळे तपासणीमध्ये नमुना फेल झाल्यास विक्रेत्यास आरोपी न करता साक्षीदार बनवण्यात यावे मुदत बाह्य कीटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी विक्रेत्यांकडून परत घ्यावेत, शेजारील राज्यातून येणारा निकृष्ट दर्जाच्या कीटकनाशके तणनाशके व बायो पेस्टिसाइड तसेच बियाणे व रासायनिक खते याची विक्री थांबवावी,केंद्र शासनाच्या कृषी विभागाकडून नवीन बियाणे कायदा २०२५ मधील विक्रेत्यांसाठी असलेल्या जाचक नियम व अटी शितल कराव्यात मुदत बाह्य कीटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी विक्रेत्याकडून परत घ्यावीत या विविध प्रलंबित मागण्यां या निवेदनात करण्यात आल्या या मागण्यांवर शासनाच्या कृषी विभागाकडून त्वरित निर्णय व्हावा यासाठी शासनाचे लक्ष वेधण्याकरिता राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्र २७ एप्रिल पासून बेमुदत बंद ठेवणार असल्याची असल्याचे निवेदनात म्हटले आहे या येणाऱ्या अडचणीसाठी कृषिमंत्री व राज्याचे प्रधान सचिव (कृषी ) व राज्याचे निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण विभागाचे संचालक यांच्याकडे कृषी सेवा केंद्राचे विक्रेते गेली चार-पाच वर्षापासून पाठपुरावा करत आहेत परंतु राज्याच्या कृषी विभागाकडून विक्रेत्यांच्या अडचणी सोडवण्याबाबत कोणतेही ठोस कार्यवाही होत नसल्याने राज्यातील कृषी निविष्ठा विक्री त्यांनी बेमुदत बंद आंदोलन करण्याचा पवित्र उचलला असल्याचेही या निवेदनात म्हटले आहे. राहत्याचे तहसीलदार राहता तालुका कृषी अधिकारी राहत्याचे पीआय यांच्याकडेही अशा आशयाचे निवेदन देण्यात आले असल्याची माहिती राहाता तालुका कृषी असोसिएशनचे अध्यक्ष व जिल्हा फर्टीलायझर असोसिएशनचे जे संचालक कैलास रावसाहेब वर्पे यांनी दिली आहे.

### आ. रोहित पवार आरोपमुक्त

छापेमारी केली होती. या प्रकरणावरुन राजकीय वातावरण तापलं होतं. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नेत्यांनी ही कारवाई राजकीय सूडबुद्धीने केली जात असल्याचा आरोप केला होता. तर विरोधकांनी या प्रकरणावरुन भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. मुंबई गुन्हे शाखेने ऑगस्ट २०१९ मध्ये या प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणातील ऋखठ मध्ये गंभीर आरोप होते. महाराष्ट्र राज्य शिखर सहकारी बँकेच्या तत्कालीन अधिकारी आणि संचालकांनी अनेक साखर कारखाने हे अत्यल्प किंमतीत विकले. त्यात पारदर्शकता ठेवली नाही. कादेशीर प्रक्रिया मोडीत काढली आणि आपल्या निकटवर्तीयांना किंवा संबंधित कंपन्यांना फायदा मिळवून दिला, असा आरोप करण्यात आला होता. यामध्येच कन्नड साखर कारखान्याचं एक प्रकरण होतं. याच प्रकरणात रोहित पवार यांच्यावर आरोप करण्यात आले होते. कन्नड साखर कारखान्यावर ८० कोटींपेक्षा जास्त कर्ज होतं. कर्जफेड न होऊ शकल्याने बँकेने या कारखान्यावर जप्ती आणली होती. तसेच या कारखान्याचा लिलाव बँकेकडून करण्यात आला होता. मात्र या लिलावात गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. कारखान्याची राखीव किंमत मुद्दाम खूप कमी ठेवली गेली आणि जास्त बोली लावणाऱ्या स्पर्धकाला कमकुवत कारणे देवून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर कारखाना अशा कंपनीला देण्यात आला ज्याचा संबंध बारामती ॲग्रो म्हणजेच रोहित पवार यांच्या कंपनीशी होता, असा आरोप या प्रकरणात करण्यात आला होता. ईडीने याच प्रकरणी २०२३ मध्ये बारामती ॲग्रो आणि अनेक ठिकाणी छापे टाकले होते. ईडीने अनेक कोटींची मालमत्ता जप्त केली होती. या प्रकरणी विविध घडामोडी घडल्या आहेत. यानंतर आता रोहित पवार यांना या प्रकरणात विशेष न्यायालयाने आरोपमुक्त केले आहे.

### आकारी पडीत शेतकऱ्यांना सिलिंग ॲक्टप्रमाणे जमिनी मिळणार

उपस्थित होते. श्रीरामपूर तालुक्यातील ९ गावांमधील आकारी पडीत जमिनींवर विमान इंधन निर्मिती प्रकल्पासाठी ४ हजार एकर जागा देण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांनी पोलीस ठाण्यासमोर चूल पेटवून जेलभरो आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मध्यस्थी केली. त्यांच्या विशेष प्रयत्नातून बुधवारी मंत्रालयात महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक संपन्न झाली. या बैठकीत सुमारे एक तास सविस्तर चर्चा होऊन शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यात आला.शेतकऱ्यांच्या आकारी पडीत जमिनींची मोजणी सिलिंग ॲक्टच्या नियमानुसार केली जाईल. या जमिनी सर्व शेतकऱ्यांना एकाच बाजूला एकत्रित स्वरूपात दिल्या जातील, जेणेकरून वहिवाट करणे सोपे होईल. शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमिनींची मोजणी पूर्ण झाल्यावर जी जमीन शिल्लक राहील, त्यावरच महामंडळ उद्योग व्यवसायास परवानगी देऊ शकेल. शेती महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना जमिनींचे गटवार ले-आऊट नकाशे तातडीने तयार करण्याचे आदेश दिले आहेत.

### घरात घुसून महिलेवर चाकूचे सपासप वार

प्रमाणात रक्तस्राव झाल्याने परिसरातील नागरिक हादरले.घटनेची माहिती मिळताच वाळूज एमआयडीसी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी महिलेला रंगेहात ताब्यात घेतले. झटापटीदरम्यान आरोपी किरकोळ जखमी झाली असून तिला उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून पिस्तूल जप्त केले असून इतर पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. या थरारक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. आरोपीकडून पुढील चौकशीदरम्यान हत्येमागील नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# अहिल्यानगरच्या अथर्व हरबाला जिल्हास्तरीय शारदा टेबल टेनिस स्पर्धेत किताब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव : गौरव डेंगळे** सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल,कोपरगाव येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय १५ वर्षाखालील टेबल टेनिस स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शाळेचे प्राचार्य के. एल. वाकचौरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण १२ शाळांमधील ३४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे मुलांसोबतच मुलींनीही खुल्या गटात सहभाग घेत मुलांविरुद्ध तगडी लढत दिली. जिल्ह्यातील तब्बल ९ मुलींनी या स्पर्धेत उतरून आपली गुणवत्ता




सिद्ध केली. त्यांच्या खेळामुळे स्पर्धेची रंगत अधिक वाढली आणि क्रीडा क्षेत्रातील समानतेचा सकारात्मक संदेश दिला गेला.

स्पर्धेचे उद्घाटन सिद्धेश कपिले, किरण पवार, सुनील आहेर, रामदास खरात, नमिष, पर्यवेक्षिका पल्लवी ससाणे, नाथलीन फर्नांडिस,क्रीडा विभाग प्रमुख धनंजय देवकर तसेच शाळेतील शिक्षकांच्या उपस्थितीत पार पडले.संपूर्ण स्पर्धेत एकूण ३५ सामने खेळवण्यात आले.उपांत्य फेरीत अथर्व हरबाने अनुवेद गाडेकरचा ३-० असा सरळ पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात अब्दुल तांबटकरने रितेश दहिवलकरचा ३-० ने पराभव करून अंतिम फेरी गाठली.

अंतिम सामन्यात अथर्व हरबाने अब्दुल तांबटकरवर ११-०९, ११-०८, ११-०९ अशा सरळ सेट्समध्ये मात करत विजेतेपद पटकावले. अथर्वच्या अचूक सर्व्हिस आणि आक्रमक खेळामुळे अंतिम सामना अत्यंत रंगतदार झाला.

> ''जिल्ह्यातील नऊ मुलींनी मुलांविरुद्ध उतरून दिलेली झुंज ही केवळ स्पर्धेची आकर्षक बाब नव्हती, तर क्रीडा क्षेत्रात मुलींच्या वाढत्या आत्मविश्वासाचे आणि समानतेच्या दिशेने टाकलेल्या भक्कम पावलाचे प्रतीक आहे.''
>
> **गौरव अरविंद डेंगळे**
> ( FIVB Level १ व्हॉलीबॉल प्रशिक्षक)

स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. विजेता अथर्व हरबा याला २१०० व चषक, उपविजेता अब्दुल तांबटकर याला ११०० व चषक, तृतीय क्रमांक अनुवेद गाडेकर याला ५०० तर चतुर्थ क्रमांक रितेश दहिवलकर याला ३०० रोख पारितोषिक देण्यात आले.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल आल्हाट, गणेश वाघ,गणेश मोरे तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.पंच म्हणून साहिश वाघ, अर्णव गगे, जिशान इनामदार, जयदीप दरंगे यांनी काम पाहिले.

## हवामान सहनशील भुईमूग वाणांची निर्मिती काळाची गरज : डॉ. डी. के. यादव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** बदलत्या हवामान परिस्थितीत टिकून राहण्यासाठी भुईमूग पिकात बहुगुणधर्मीय व हवामान-ताण सहनशील वाणांची निर्मिती करणे अत्यावश्यक असल्याचे मत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या पीक विज्ञान विभागाचे उपमहासंचालक डॉ. डी. के. यादव यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या शासकीय कृषी महाविद्यालय, पुणे येथे आयोजित अखिल भारतीय समन्वयित भुईमूग सुधार प्रकल्पाच्या तीन दिवसीय वार्षिक बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच



डॉ. एस. के. बेरा, डॉ. प्रशांत बोडके, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. साताप्पा खरबडे, डॉ. महानंद माने व डॉ. दीपक दहाट यांचीही उपस्थिती होती.

डॉ. यादव म्हणाले की, अधिक उत्पादनक्षम वाण निर्मितीसाठी जीनोमिक निवड, प्रेडिक्टिव ब्रीडिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता व स्पीड ब्रीडिंगसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. तसेच अन्नद्रव्य व पाणी वापर कार्यक्षमता वाढवणे आणि गुणवत्ताविषयक घटकांवर भर देणे महत्त्वाचे ठरणार आहे. देशातील खाद्यतेलाची मागणी २४० ते २६० लाख टनांपर्यंत पोहोचली असून उत्पादन मात्र १०० ते १२० लाख टनांपर्यंत मर्यादित आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून राहावे लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी सांगितले की, महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विविध पिकांचे ३२० वाण, ५५ पेक्षा अधिक कृषी यंत्रे व २००० हून अधिक तंत्रज्ञान विकसित करून राज्याच्या कृषी विकासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. हवामान अनुकूल तंत्रज्ञान व शाश्वत शेती पद्धती विकसित करण्यावर विद्यापीठाचा भर असल्याचे त्यांनी नमूद केले.

या बैठकीत देशातील १९ राज्यांतील १५० हून अधिक शास्त्रज्ञ सहभागी झाले असून भुईमूग पिकातील सुधारित वाण, उत्पादनवाढीचे तंत्रज्ञान, कीड-रोग व्यवस्थापन व हवामान बदलाचा परिणाम या विषयांवर सखोल चर्चा होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी तर आभार डॉ. दीपक दहाट यांनी मानले.

## प्रवरासंगम येथे युवा सेनेच्या वतीने लवांडेच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम येथे देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य भास्करगिरी बाबांसह इतर वीस संतांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या विकास लवांडेच्या प्रतिमेला शिवसेना प्रणित युवा सेनेच्या वतीने जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. संतांबद्दल टीका व अपमान सहन करणार नाही अशा व्यक्तींवर योग्य ती कडक कारवाई होण्यासाठी रस्त्यावर येऊ,संतांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रवृत्तीना जागीच ठेचा असे आवाहन युवा सेनेचे नेते उद्योजक शुभम उगले यांनी यावेळी बोलतांना केले

प्रवरासंगम येथील बाजारतळ प्रांगणात हनुमान मंदिरासमोर शिवसेना प्रणित युवा सेनेच्या वतीने झालेल्या निषेध सभेत त्रिव भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.गुरुवर्य श्री भास्करगिरी बाबा हे लाखो हिंदूंचे श्रद्धास्थान आहे, त्यांनी दिलेल्या शिकवणी नुसार भरकटलेल्या व्यक्ती निर्व्यसनी जीवन जगून सुखी संसाराकडे वाटचाल करू लागले आहे यामध्ये अशा विकृत स्वरूपाच्या व्यक्तींकडून होत असलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे समाजातील वातावरण दूषित होत असते म्हणून अशा प्रवृत्ती जागीच ठेवल्या पाहिजे अशी भावना युवा सेनेचे नेते शुभम उगले यांनी व्यक्त केली. यावेळी झालेल्या निषेध आंदोलन प्रसंगी युवा सेनेचे शुभम उगले पाटील यांच्यासह हिंदू धर्म प्रचारक गजानन गवारे, माजी सरपंच राहुल लकारे,उपसरपंच काका खंडागळे, दीपक आव्हाळे,उदय पांडव,चंद्रकांत गायकवाड,भाऊराव गायकवाड,पप्पू गोत्राने,विशाल पांडव,रविंद्र फाजगे, अक्षय म्हस्के,दीपक रेलकर,अशोक वाकचौरे, सतीश तिडके उपस्थित होते

# गोदा ते नर्मदा जलयात्रेचे शिर्डीत रविवारी मंगलमय आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** गोदावरी ते नर्मदा असा आध्यात्मिक व सांस्कृतिक सेतू उभारणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गोदा ते नर्मदा जलयात्रा' दि.२५ एप्रिल रोजी शिर्डीत दाखल होणार असून, या निमित्ताने राज्यातील ३० प्रमुख नद्यांच्या जलकलशांचे पूजन आणि भव्य सांस्कृतिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. जलसंपदा विभागाच्या वतीने 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त २५ ते २९ एप्रिल दरम्यान या जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र चौंडी व

## ३० नद्यांच्या जलकलशांचे पूजन

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून सुरू झालेली ही यात्रा मध्यप्रदेशातील श्रीक्षेत्र महेश्वरपर्यंत सुमारे ८५० किलोमीटरचा प्रवास करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

या यात्रेच्या माध्यमातून जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाचा संदेश देण्यात येत असून, राज्यातील ३० प्रमुख नद्यांचे जलकलश शिर्डीत एकत्र आणले जाणार आहेत. वारकरी संप्रदायातील संत-महंतांच्या हस्ते या जलकलशांचे सामूहिक पूजन होणार आहे. जलसाक्षरता वाढविणे, पाण्याचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविणे आणि लोकसहभागातून जलसंवर्धनाला चालना देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिर्डी येथे यात्रेच्या स्वागतासाठी क्रीडा संकुल मैदानावर भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'वारसा, विचार आणि विकास' या त्रिसूत्रीवर आधारित या सोहळ्यात स्थानिक कलाकारांच्या सादरीकरणासह विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन होणार आहे.

दरम्यान, चौंडीहून निघालेली यात्रा अहिल्यानगर, नेवासा, श्रीरामपूर, पुणतांबा मार्गे शिर्डीत पोहोचणार असून, त्र्यंबकेश्वरहून निघालेली यात्रा संगमनेर, जोर्वे, उंबरी, आश्वी, लोणी, कोल्हार, राहाता मार्गे शिर्डीत दाखल होणार आहे. मार्गावरील गावांमध्ये ग्रामस्थांकडून जलयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्याची तयारी सुरू आहे.

## प्रवराच्या लब्धीचे दहावी बोर्डाच्या परीक्षेत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूल प्रवरानगरची विद्यार्थीनी लब्धी नितीन गांधी हिने सीबीएससी बोर्डाचा इयत्ता दहावीच्या नुकत्याच झालेल्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. तिने ९४ टक्के गुण मिळवून यश प्राप्त केले आहे. आश्वी बुद्रुक येथील प्रतिष्ठित कापड व्यवसायिक धनराज गांधी यांची नात तर नितीन गांधी यांची मुलगी आहे. तिच्या यशाबद्दल प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सी ई वो सुक्षीमीता विखे , विश्वस्त ॲड रोहीनी निघुते,भाऊसाहेब जऱ्हाड, प्रवरा बॅंकेचे संचालक संजय गांधी,जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुम्मतीलाल गांधी, मनोज पटवा,निलेश रातडीया,सुशील भंडारी,प्रितम गांधी,अभिजीत गांधी,रोहित भंडारी,अश्विन मुथ्था,समीर गांधी,निलेश चोपडा,दिपक बोरा ,मिलिंद बोरा,योगेश लुकंड, विनित गांधी अमीत भंडारी ,राजेंद्र भंडारी,योगेश रातडीया यांनी अभिनंदन केले आहे.




## अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक अनोळखी ३० वर्षीय इसमाचा उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अनोळखी इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास गंगापूर पोलीसांना संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

गंगापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक अनोळखी ३० वर्षीय इसम २१ एप्रिल रोजी आढळून आला यास पोलीस हवालदार अमीत पाटील यांनी यास बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सदरील इसमा बाबत काही ओळख पटल्यास त्याचे नातेवाईक यांना माहिती द्यावी. तसेच गंगापूर पोलीस हवालदार अमित पाटील मोबाईल क्रमांक ८८८८८०२९२८ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME QAISAR YUNUS SAYYAD ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS KAUSARSABA ASIF SHAIKH (AADHAR NO. 4458 6836 9482) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 22/04/2026


## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि .२३ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२० ६७० ५८० | ३-४ | १२० २२८ २००

जोड ३०-६०-१७-९२-४५

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१०५ १३८ ६०८ | ६-१ | १२८ २९० २०९

जोड ६२-९१-४५-०८-४५

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

४८० ५७० ६६० | २-९ | १२६ १८० ११७

जोड २१-०९-३५-६७-९४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६



## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *


# शाही थाटात पार पडला साखरपुड्याचा भव्य सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आहिल्यानगर,:** मसालाकिंग धनंजय दातार आणि त्यांच्या पत्नी वंदना दातार यांनी आपल्या सुपुत्र रोहित दातार आणि सानिया नरवाडे यांच्या साखरपुड्याचा भव्य सोहळा मुंबईतील प्रतिष्ठित ताज लँड्स एंड येथे मोठ्या थाटामाटात आयोजित केला. या देखण्या संध्याकाळी कुटुंबीय, मित्रमंडळी आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या आयुष्याच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या या जोडप्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला.

या सोहळ्यात एक अप्रतिम संगीतमय कार्यक्रम रंगला, ज्यामध्ये प्रसिद्ध गायक सुदेश भोसले आणि वैशाली सामंत यांच्या सादरीकरणांनी वातावरणात उत्साह आणि ऊर्जा भरली. या संगीतसंध्येला आणखी रंगत आणली ती सिद्धांत भोसले यांच्या मधुर आवाजाने, ज्यांनी आपल्या गायनाने उपस्थितांची मनं जिंकली.



या खास प्रसंगी वराची आई वंदना दातार यांनी तालावर नृत्य करत आपल्या आनंदाची आणि उत्साहाची सुंदर अभिव्यक्ती केली, हा क्षण सर्वांसाठी खास ठरला.

कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेत्री 'नटरंग' फेम सोनाली कुलकर्णी आणि मानसी नाईक यांच्या जोशपूर्ण नृत्य सादरीकरणांनी रंगत आणखी वाढवली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ चांदेकर यांनी केले, त्यांच्या उत्साही आणि आकर्षक उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

या सोहळ्याचे खास आकर्षण ठरले ते अनोखे रिंग सेरेमनी, जिथे साखरपुड्याच्या अंगठ्या ड्रोनद्वारे खाली आणण्यात आल्या, ज्यामुळे पारंपरिक विधींना आधुनिकतेचा एक सुंदर आणि अनोखा स्पर्श मिळाला आणि सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले.

याप्रसंगी धनंजय दातार म्हणाले, या शुभदिनी आम्ही या जोडप्याला आयुष्यभर एकत्र राहण्याच्या, आशीर्वादांच्या आणि आनंदाच्या असंख्य क्षणांच्या हार्दिक शुभेच्छा देतो.

सानियाचे आई-वडील सीमा आणि कुमार नरवाडे यांनी कुटुंबीय आणि मित्रमंडळींचे मनापासून स्वागत केले आणि हा आनंदाचा क्षण उत्साहाने साजरा केला. रोहितचा मोठा भाऊ हृषिकेश दातार आणि त्यांची पत्नी आकांक्षा यांनीही उपस्थितांचे प्रेमपूर्वक स्वागत करत या सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला.

संध्याकाळी शेवटी पाहुण्यांनी स्वादिष्ट आणि खास खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत, प्रेम, आनंद आणि एकत्रतेने भरलेला हा सोहळा अविस्मरणीय ठरवला.

# बसस्थानकाचे काम उच्च दर्जाचे व्हावे : आ.पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**कर्जत :** कर्जत बसस्थानक परिसरातील सिमेंट काँक्रीटीकरण उत्तम आणि दर्जेदार प्रतीचेच व्हायला हवे. त्याच्या गुणवत्तेत कसलाच प्रकार सहन केला जाणार नाही. सर्वसामान्य जनतेचा पैसा आहे. यात ठेकेदाराची कसली ही मर्जी खपवून घेतली जाणार नाही असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला. बुधवारी सकाळी आमदार पवार यांनी कर्जत बसस्थानक परिसरात स्वता येत पाहणी करीत बसस्थानक काँक्रीटीकरण कामासबंधी काही सूचना दिल्या.

दरम्यान, आ.रोहित पवार पुढे म्हणाले, बसस्थानक परिसरातील भिंती कर्जतच्या सर्व सामाजिक संघटनेने लोक सहभागातून पर्यावरण संवर्धन संदेश देत छान रंगवल्या आहेत. यामुळे किळसवाणा आणि कचरायुक्त परिसर देखणा करण्यात मोलाची भूमिका निभावली आहे याचे कौतुक आमदार रोहित पवार यांनी केले. मात्र हीच परिस्थिती कायम राहील याकडे देखील एसटी प्रशासनासह श्रमप्रेमींनी लक्ष ठेवले पाहिजे असे मत व्यक्त केले.

अनेक वर्षांपासून कर्जत बसस्थानक परिसर चिखल आणि धुळीच्या साम्राज्यात आपली सेवा देत होता. सर्वसामान्य प्रवासी आणि कर्जतकर यांनी कर्जत बसस्थानक परिसर काँक्रीटीकरण व सुशोभीकरण यासाठी वारंवार पाठपुरावा केला. मात्र त्यास तारीख पे तारीखच मिळत होती. या महत्वाच्या प्रश्नांबाबत आमदार रोहित पवार यांनी आपल्या विकासनिधीतून रक्कम मंजुरी घेत काम मार्गी लावले. काम सुरू झाले मात्र त्या कामाच्या दर्जाबाबत अनेकांनी प्रश्न उपस्थित केल्यामुळे मागील दीड आठवड्यापासून ते काम बंद पडले होते.

नुकतेच पुन्हा काँक्रीटीकरणाचे काम पुन्हा सुरू झाले असून बुधवारी आमदार रोहित पवार कर्जतला आले असता अचानक त्यांनी आपला ताफा कर्जतच्या बसस्थानकाकडे वळवला. आणि सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. यात स्टील, लोखंड कोणत्या पद्धतीने वापरले जात आहे. सिमेंट कोणत्या ग्रेडचे असून त्याची गुणवत्ता देखील तपासली. यावेळी संबंधित ठेकेदाराकडून काम उच्च प्रतीचे आणि दर्जेदारच व्हायला हवे. यात कसलीही तडजोड होणार नाही याची हमी घेतली.

यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना देखील या कामाच्या दर्जाकडे लक्ष देण्याच्या सूचना केल्या. यावेळी प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष दिनेश ढवळे, सचिव मुन्ना पठाण, सर्व सामाजिक संघटनेचे विजय तोरडमल, प्रा विशाल मेहेत्रे, सुनील साळुंके, काका लांगोरे, मनोज गायकवाड, ऋषीकेश धांडे, गणेश सुद्रीक, मंगेश शिंदे, सुधीर यादव, राहुल नवले, नितीन देशमुख, नामदेव थोरात, अशोक धांडे, भाऊसाहेब रानमाळ, कांतीलाल भिसे, दीपक माने, बाबा भिसे, दीपक भिसे, पृथ्वीराज चव्हाण आदी उपस्थित होते.

## अंबादास कळमकर यांना डॉ.देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार जाहीर



**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील आव्हाणे बु येथील गोपालक व पंचायत समितीचे माजी उपसभापती अंबादास कळमकर यांना सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्याबद्दल 'पद्मश्री डॉ. मनीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे.

अंबादास कळमकर यांना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून यापूर्वी आदर्श गोपालक पुरस्कार देण्यात आला असून त्या माध्यमातून त्यांना कृषी विभागाच्या वतीने चीन शेतकरी दौरा भेटीत ते सहभागी झाले होते.त्या माध्यमातुन त्यांनी शेतक-यांना शेती व्यवसायामध्ये उत्पादन वाढीसाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले असुन तसेच दुग्ध व्यवसाय व दुध डेअरीच्या माध्यमातून दुग्ध व्यावसायिकांना त्यांनी वेळोवेळी संस्थेच्या माध्यमातून अर्थसाहाय्य केले असुन गेल्या वीस वर्षांपासून ते आव्हाणे सेवा सोसायटीचे ते चेअरमन असुन त्या माध्यमातून शेतकऱ्यांना वेळोवेळी सहकार्य केले असुन माजी आमदार नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना शेवगांव पंचायत समितीचे उपसभापती म्हणून काम करण्याची संधी मिळाली त्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य शेतकरी यांना पंचायत समितीच्या विविध योजना तळागाळा पर्यत पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असुन त्यांच्या या सातत्यपूर्ण व समर्पित कार्याची दखल घेत त्यांना हा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान जाहीर करण्यात आला आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, दि २७ एप्रिल रोजी सायंकाळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. कळमकर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे आव्हाणे व पंचक्रोशीतुन अभिनंदन होत आहे.

## महिलांना आरक्षण नव्हे, संरक्षण हवे- खासदार शोभा बच्छाव

**अहिल्यानगर :** महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात आणि देशात राजकीय वातावरण तापले असताना काँग्रेसच्या खासदार शोभा बच्छाव यांनी भाजप व केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. भाजपचे बोलणे हे लबाडाचे बोलणे आहे. महिला आता सर्व काही ओळखून आहेत. आज महिलांना आरक्षण नको, तर संरक्षण द्या अशी म्हणण्याची वेळ आली आहे, असे परखड वक्तव्य अहिल्यानगर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालय येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केले.

या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, शहराध्यक्ष दीप चव्हाण, महिला काँग्रेसच्या सदस्य प्रतिभाताई घोगरे, ब्लॉक अध्यक्ष फिरोज खान तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

बच्छाव यांनी स्पष्ट केले की, महिला आरक्षणाबाबत काँग्रेसने कधीही विरोधाची भूमिका घेतलेली नाही. उलट २०२३ मध्ये केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेसने ठाम पाठिंबा दिला होता. हे विधेयक संसदेत मंजूर होऊन राष्ट्रपतींचीही मान्यता मिळालेली आहे. मात्र, काँग्रेसने विरोध केला असा खोटा प्रचार भाजपकडून केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

## पोपट शेळके यांना रोटरीचा 'सक्षम आत्मनिर्भय' पुरस्कार

**अहिल्यानगर :** दिव्यांगत्वावर मात करत स्वतःच्या कर्तृत्वाने यशस्वी व्यावसायिक म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या शहरातील पोपट शेळके यांचा अहमदनगर रोटरी सेंटर या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या वतीने 'सक्षम आत्मनिर्भय' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या जिद्द, संघर्ष आणि समाजसेवेच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

अहमदनगर रोटरी सेंटरच्या संमेलनात प्रांतपाल तथा अध्यक्ष सुधीर लातूरे यांच्या हस्ते शेळके यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सौ. संगिता लातुरे, सहाय्यक प्रांतपाल माधुरा झावरे, सचिव राजगोपाल तापडिया, सेक्रेटरी सुनील मुथा, एक्झिक्युटिव सेक्रेटरी हरीश नय्यर, रोटरीचे अध्यक्ष सुनिल कटारिया यांच्यासह संचालक व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.रोटरी क्लबच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांना मदतीचा हात देणे, शैक्षणिक सहाय्य, आरोग्य सेवा, जनजागृती, महिला सक्षमीकरण तसेच पर्यावरण संवर्धन यांसारखी विविध उपक्रम सातत्याने राबवले जातात. याचबरोबर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी अशा पुरस्कारांच्या माध्यमातून गौरविण्यात येते.

# आव्हाणेच्या शेतकऱ्याने घेतले कांद्याचे विक्रमी उत्पादन



शेती व्यवसाय हा तंत्रशुद्ध पध्दतीने व आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे केल्यास कमी श्रमामध्ये व ठिंबक सिंचनाच्या साहाय्याने केल्यास चांगले विक्रमी उत्पादन मिळते शेती व्यवसायामध्ये कुठल्याही एक पिकांवर अवलंबून न राहता अंतर पीक घेण्यावर भर द्यावा व भविष्यात कमी पाण्यावर घेतली जाणारी पीके घ्यावीत.

**– सर्फराज सय्यद (शेतकरी)**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु येथील शेतकरी सर्फराज कंकर सय्यद यांनी दीड एकर कांदा लागवडी मधुन ५० टन कांद्याचे विक्रमी उत्पादन घेतले आहे.शेवगांव तालुक्यात विक्रमी उत्पादन घेणारे शेतकरी ते ठरले आहेत.

सय्यद यांनी शेती व्यवसाय परवडत नाही म्हणणाऱ्या शेतक-यासमोर एक आदर्श प्रस्तापित केला असुन सर्फराज सय्यद यांनी एक वर्षाच्या आंबा बागेमध्ये दीड एकर क्षेत्रामध्ये साडेतीन फुटाच्या बेडमध्ये मिल्चिंगवर ठिंबक च्या साहाय्याने कांदा लागवड करून एकरी ३३ टन कांदा चे उत्पादन घेतले आहे मल्चिंगवर कांदा लागवड हा शेवगांव तालुक्यातील पहिलाच प्रयोग आसुन आंतरपीक म्हणून त्यांनी चांगला पर्याय निवडला असुन त्यांना शेतकरी योगेश पडिंत, आदिनाथ दिघे , मंखळ पांढरे ,नानासाहेब डोंगरे यांनी कांदा शेतीसाठी प्रोत्साहित केले.

कांदा पिकांच्या योग्य मार्गदर्शनासाठी त्यांना बाबासाहेब पिसोरे, डॉ. बी.टी गोरे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे , उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, मंडळ कृषी अधिकारी शितल नागवडे, उपकृषी अधिकारी प्रकाश कांबळे व सहाय्यक कृषी अधिकारी आजिनाथ कुंढारे यांचे वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन लाभले.

# कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकरी कर्जाच्या विळख्यात?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** श्रीगोंद्यातील शेतकऱ्यांनी कांदा लावला सोन्यासारखा, पण विकायला आला मातीच्या भावात!अशी कडवट वास्तवाची चव सध्या श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी चाखत आहेत. कांद्याचे भाव गडगडल्याने उत्पादन खर्चही निघेनासा झाला असून शेतकरी अक्षरशः आर्थिक संकटात सापडले आहेत.

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी, लोणी व्यंकनाथ ,बेलवंडी, हंगेवाडी,टाकळी कडेवळीत,चांडगाव,शेडगाव यासह आदी गावांमध्ये यंदा उन्हाळी कांद्याची मोठ्या प्रमाणात लागवड झाली. मात्र, उत्पादन कमी आणि भाव कमीचया दुहेरी फटक्याने तालुक्यातील शेतकऱ्यांचे गणित कोलमडले. लागवड ते काढणीपर्यंत बी-बियाणे, खते, औषध फवारणी, मजुरी असा एकरी सुमारे ४० ते ५० हजारांचा खर्च येतो; पण बाजारात दर मात्र प्रति क्विंटल अवघे ५०० ते ६०० रुपयांपर्यंत घसरले आहेत. काही दिवसांपूर्वी ८०० रुपयांवर असलेले दरही आता 'डायरेक्ट स्लाइड' झाले आहेत. आज बाजारात आवक वाढली,मात्र भाव पडले आहेत बाजारात नव्या कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्याने भावावर दबाव आला आहे. त्यात निर्यातीवरील निर्बंध आणि शुल्कवाढीच्या चर्चेमुळे स्थानिक बाजारपेठा आणखी कोसळल्या. परिणामी,आज शेतातील कांदा काढायचा तर तोटा, ठेवायचा तर सडतोय अशी कोंडी शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहे.त्यातून कांदा काढल्यावर दर नसल्याने अनेकांनी कांदा चाळीत साठवण्याचा पर्याय निवडला; पण बदलत्या हवामानामुळे साठवलेला कांदा खराब होण्याची भीती वाढली आहे.खरीप हंगामाचा खर्च या पिकावर अवलंबून असतो. पण कांद्यानेच वांदे केल्याने कर्जाचा डोंगर वाढतोय, असे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले. परिस्थिती अशी की, मेहनत, पैसा आणि वेळ सगळंच गुंतलं, पण परतावा शून्याच्या आसपास असल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त करताना दिसत आहे.


### ऐन उन्हाळ्यात तहानलेल्या गावांना

# पैठण उजवा कालव्यातील पाणी आवर्तनाचा मोठा दिलासा?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** दिवसेंदिवस उन्हाची प्रचंड प्रमाणात तीव्रता वाढत चालली असून या वाढत्या तीव्रतेमुळे जमिनीतील पाणी पातळीही खालावली गेली असल्यामुळे शेवगाव तालुक्यातील अनेक गावातील पाण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनत चालला असतानाच पैठण येथील नाथसागराच्या जलाशयातून उजव्या कालव्यात सुटणारे उन्हाळी पाणी आवर्तन सोमवार ( दि.२०) रोजी सुटले असल्यामुळे या सुटलेल्या आवर्तनामुळे असंख्य गावातील शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. पैठण उजवा कालव्याअंतर्गत शेवगाव तालुक्यातील खडके, मडके, खामपिंपरी,पिंगेवाडी,प्रभुवडगाव,लखमापुरी,दहीगाव -शे, गदेवाडी,हातगाव ,मुंगी, कांबी,बोधेगाव, बालमटाकळी, गायकवाड जळगाव या गावांना शेतीसिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रत्येक उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात दिलासा मिळत असून चालू वर्षीच्या उन्हाळ्याने मोठा कहर केला असल्याने दररोजच्या वाढत्या उष्णतेमुळे तसेच चालू वर्षी विद्युत पंपाऐवजी सोलरच्या सतत होणाऱ्या उपशामुळे जमिनीत पाणीच राहिले नसल्याने निव्वळ पैठण उजवा कालव्यावर अवलंबून असणाऱ्या वरील सर्वच्या सर्व गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनत चालला असतानाच आता त्या तहानलेल्या ठिकाणी या सुटलेल्या पाणी आवर्तनाचा फायदा होणार आहे.चालू वर्षी या संपूर्ण कालव्याच्या दुरुस्तीचे काम जलसंपदा विभागाने हाती घेतले असल्याने होणारे ही काम जवळपास ५० ते ५५ वर्षानंतर होत असल्याने कालवा आता नव्या स्वरूपाचा झाला असल्याचे दिसून येत आहे.

१३४ की मी च्या अंतराने गेलेला हा कालवा माजलगाव पर्यंत नेऊन तेथील असणाऱ्या जलाशयात झिरो करण्यात आला आहे.या कालव्यांतर्गत शेवगाव, गेवराई व माजलगाव या तीन तालुक्यासह इतरही अनेक इंडस्ट्रियल यरीयासाठी हा कालवा वरदान ठरत आहे.



# शेवगाव पंचायत समितीत भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप

## 'जय शिवसंग्राम'चा ठिय्या आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव –** शेवगाव पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मनरेगा योजनेतील कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व अनियमितता होत असल्याचा गंभीर आरोप 'जय शिवसंग्राम' पक्षाने केला आहे. यासंदर्भात पक्षाचे जिल्हाध्यक्ष नवनाथ इसारवाडे यांनी तहसीलदारांना निवेदन सादर करून गटविकास अधिकाऱ्यांची चौकशी करून तात्काळ बदली करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पंचायत समितीमार्फत मंजूर झालेली मनरेगा योजनेतील वैयक्तिक लाभाची अनेक कामे दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. संबंधित लाभार्थ्यांनी व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी पंचायत समिती कार्यालयात पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासोबतच, कामे मंजूर करून घेण्यासाठी किंवा प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी विशिष्ट रक्कम देण्याचा दबाव टाकला जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. पैसे न दिल्यास मंजूर कामेही वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ठेकेदारांच्या बिलांनाही टक्केवारी घेतल्याशिवाय मंजुरी मिळत नसल्याचे सांगण्यात आले आहे. या सर्व प्रकारामुळे पंचायत समिती कार्यालयात भ्रष्टाचाराचे जाळे निर्माण झाले असून या प्रकरणात गटविकास अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांची बदली करण्यात यावी तसेच दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा येत्या सोमवार दि. २७ एप्रिल २६ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती शेवगाव येथे गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा 'जय शिवसंग्राम' पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती ग्रामविकास मंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), तसेच पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या असून प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे.



# माध्यमिक शिक्षक सोसायटीकडून नंदकुमार कुरुमकर यांचा सन्मान

**लिंपणगाव :** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीला संस्थेचे जेष्ठ सभासद नंदकुमार कुरुमकर यांचे गेल्या ३०-३५ वर्षात बहुमोल सहकार्य लाभले, असे गौरवोद्गार माध्यमिक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप यांनी व्यक्त केले.

पत्रकार नंदकुमार कुरुमकर हे शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्ध प्रमुख पदी निवड झाल्याने माध्यमिक शिक्षक सोसायटी श्रीगोंदा शाखेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संचालक आप्पासाहेब जगताप यावेळी म्हणाले की, नंदकुमार कुरुमकर हे माध्यमिक सोसायटीचे ज्येष्ठ सभासद असून, त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून या सोसायटीने सभासदांच्या हितासाठी धोरणात्मक निर्णय घेताना नेहमीच कुरुमकर सरांचे या सोसायटीला मार्गदर्शन व प्रसिद्धी मिळाली. सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटीचा कारभार हा अत्यंत काटकसरीने व सभासदांच्या हितासाठी चालवला जात आहे.

सोसायटीकडून मयत सभासदांची संपूर्ण कर्ज माफ, ठेवीवर आकर्षक व्याज, त्याबरोबरच पुत्रदान, कन्यादान ही योजना ही प्रभावीपणे राबवली जात आहे. यावेळी माध्यमिक सोसायटीचे संचालक विजय पठारे, सभासद व श्रीगोंदा तालुका क्रीडा अध्यक्ष सचिन जामदार, राहुल आढाव सर, अशोकराव कांबळे सर, विजयराव काटे सर, शाखेचे शाखा अधिकारी वैभव चौगुले, लिपिक कानिफनाथ तुर्कुंडे, अर्जुनराव घोडके यांच्यासह सेवक वृंद उपस्थित होता.

# सुभेदार शिंदे यांचे हृदयविकाराने निधन

## शासकीय ईतमामात अंत्यसंस्कार



**करंजी :** दगडवाडी ता.पाथर्डी येथील सैन्यदलात भरती झालेल्या बबन दत्तात्रय शिंदे (वय ४६ ) यांचे अमृतसर (पंजाब) येथे ड्युटीवर असतानाच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले . त्यांचा पार्थिव देह बुधवारी सकाळी त्यांच्यावर दगडवाडी येथे शासकीय इतमामात अंत्संसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील मोठा समुदाय यावेळी उपस्थित होता .

सुभेदार बबन शिंदे यांचे पार्थिव विशेष विमानाने अमृतसर येथून पुणे येथे व पुणे येथून अहमदनगर मार्गे दगडवाडी येथे आणण्यात आले. सैन्याच्या सजवलेल्या रथामध्ये त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले व दगडवाडी येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर शासकीय इतनामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र पोलिसांच्या वतीने व मॅकेनाईज्ड इनफन्ट्री या सैन्यात दलाच्या विभागातील जवानांनी हवेत फायर करत त्यांना मानवंदना दिली. मात्र त्यापूर्वीच मंगळवारी शासकीय पिटी करून ते घरी आले असता अचानक त्यांना छातीत दुखू लागले व त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी कॅप्टन रंगनाथन, कॅप्टन राघवन, कॅप्टन आर के ढाका, सुभेदार बलवंत सिंग ,कॅप्टन अभिमन्यू पाथर्डीचे तहसिलदार उद्धव नाईक तसेच त्रिदल या माजी सैनिकांची संघटना यांसह अक्षय कर्डिले ,ज्ञानेश्वर महाराज, कराळे व सरपंच सुभाष शिंदे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी करंजी, दगडवाडी , भोसे, बाभुळगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी सुभेदार बबन शिंदे अमर रहे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

### अस्थी नव्हे, आशेचे रोप..

# बिबे परिवाराची पर्यावरणपूरक अनोखी श्रद्धांजली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** परंपरा जपायची, पण काळाच्या हाकेला उत्तर द्यायचं याचं जिवंत उदाहरण बिबे परिवाराने घालून दिलं आहे. नदीत अस्थी विसर्जन करण्याऐवजी झाड लावून श्रद्धांजली अर्पण करण्याचा निर्णय घेत, त्यांनी पर्यावरणपूरक आणि प्रेरणादायी पाऊल उचललं.

श्रीगोंदा तालुक्यातील नामांकित वकील व माजी नगरसेवक श्री रंगनाथ उर्फ बापू बिबे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने बिबे परिवार, नातेवाईक आणि मित्रपरिवार शोकाकुल झाला आहे. पंचक्रोशीतील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणून ओळखत.यापूर्वी त्यांच्या धर्मपत्नी उषाताई बिबे यांच्या निधनानंतरही परिवाराने अस्थी नदीत विसर्जित न करता वृक्षलागवड करून त्याच झाडाच्या मुळाशी रक्षाविसर्जन केले होते. आता बापूंच्या स्मरणार्थ त्यांच्या मुलांनी संकेत बिबे, सचिन बिबे, मुलगी संदीप आटोळे व जावई सुखदेवराव आटोळे यांनी त्याच बागेत वृक्षलागवड करून अस्थी विसर्जन करत एकात्मिक श्रद्धांजली अर्पण केली.रंगनाथ बिबे हे स्वतः वृक्षप्रेमी व समाजसेवक म्हणून ओळखले जात.



त्यांनी लावलेल्या झाडाचा चाळीसावा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याची त्यांची आगळी परंपरा होती झाडांसोबत नातं जपण्याची ही शैली आजही लोकांच्या स्मरणात आहे.या वेळी सत्यशोधक पद्धतीने विधी पार पाडत भीमराव कोथिंबीरे, तसेच सामाजिक कार्यकर्ते नाना शिंदे उपस्थित होते. कोणतेही अवडंबर न करता, नदी प्रदूषण टाळत केलेल्या या कृतीचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.श्रद्धांजली ही केवळ विधी नसून, ती भविष्यासाठीची गुंतवणूक आहे. असेही त्याचे सहकारी पर्यावरण प्रेमी याच्यातुन बोलले जात आहे

द • ख • ल

## पुण्यातील श्री सदगुरू शंकर महाराज भक्तांचे पहिले अन्नछत्र



**कवठे येमाई :-** पुणे धनकवडीतील श्री सद्गुरू शंकर महाराज भक्तांचे पहिले अन्नछत्र समिती ट्रस्टच्या वतीने महाष्टमी निमित्त एक विशेष सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी श्रींच्या ७१ व्या समाधी दिनानिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष राजाभाऊ रेवडे,डॉ.दिनेश रंगरेज यांनी दिली. हे शिबिर सायंकाळी ५ ते ९ या वेळेत उत्सव मंडप, धनकवडी पुणे येथील श्रींच्या मठाजवळ, ईशान्य सोसायटी समोर येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये सर्व गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या उपक्रमाचे संयोजन डॉ. दिनेश सूर्यकांत रेंगोज व त्यांच्या डॉक्टर्स टीमकडून करण्यात आले असून, विविध रुग्णालये व संस्थांचे सहकार्य यात लाभले आहे. समाजहिताच्या दृष्टीने आयोजित या उपक्रमामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, भक्त व नागरिकांकडून या सेवाभावी कार्याचे कौतुक होत आहे

## मत्स्यव्यवसाय योजनांसाठी एनएफडीपी पोर्टलवर नोंदणी बंधनकारक

**पुणे :** जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाशी संबंधित सर्व व्यक्ती व संस्थांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डिजिटल प्लॅटफॉर्म (एनएफडीपी) पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय अर्चना शिंदे यांनी केले आहे. जिल्ह्यातील वैयक्तिक मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्य विक्रेते, मच्छिमार सहकारी संस्थांचे सभासद तसेच मत्स्यउत्पादन शेतकरी संघ यांना विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी एनएफडीपी पोर्टलवर नोंदणी अनिवार्य आहे. ही नोंदणी संबंधित संकेतस्थळावर स्वतः किंवा जवळच्या सीएससी केंद्रात आधारकार्ड व बँक पासबुकसह विनामूल्य करता येणार आहे. तसेच ई-श्रम कार्ड नोंदणीही संबंधित संकेतस्थळावर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. याशिवाय किसान क्रेडिट कार्ड व अपघात गट विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, हडपसर, पुणे येथे संपर्क साधावा.

## प्रा.जाधव यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**सोमेश्वरनगर -** बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथील मु.सा. काकडे महाविद्यालयातील प्रा. जाधव पोपट यशवंत यांनी समकालीन हिंदी उपन्यासों चित्रित मुंबई परिवेश या विषयावर सादर केलेल्या शोध प्रबंधासाठी सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय पुणे ड्रा पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रो. डॉ. सदानंद भोसले (सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय पुणे, अध्यक्ष, हिंदी विभाग) यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी महाविद्यालयीन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मा. सतीश काकडे-देशमुख, प्राचार्य, डॉ. देविदास वायदंडे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभिजित काकडे देशमुख, व्यवस्थापन समितीचे सचिव सतीश लकडे,सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मधुमित्र-मधुसखी पुरस्कारासाठी नामांकन अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यावतीने सन २०२६ या वर्षाकरिता मधुमित्र-मधुसखी पुरस्कार देण्यात येणार आहेत; याकरिता नामांकन अर्ज ४ मे २०२६ अखेर सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासोबतच मध उत्पादकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मंडळाकडून ही योजना राबविण्यात येत आहे. गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमांतर्गत मधमाशीपालन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मधपालकांचा सन्मान करण्यात येतो. या पुरस्कारात प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन पुरस्कार दिले जाणार असून, त्यापैकी एक पुरस्कार महिला मधपालकांसाठी राखीव आहे. पुरस्कारांची रक्कम अनुक्रमे प्रथम ११ हजार रुपये, द्वितीय ७ हजार व तृतीय ५ हजार रुपये अशी आहे.जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य (२० मे) साधून जिल्ह्यास्तरीय कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.पुरस्काराची लिंक https://mskvib.g संकेस्थळावर आहे. नामांकन अर्ज जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी कार्यालयाशी (संपर्क क्रमांक ०२०-२५८११८५९) संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी कळविले आहे.

## समाज हीच खरी कुटुंब व्यवस्था, याप्रती सद्भावना जपणे गरजेचे : हरिदास वानखेडे

**वाघोली (पुणे) प्रतिनिधी :-** समाजातील वंचित, गरजू घटकांसाठी कार्य करणे ही केवळ जबाबदारी नसून ती एक सामाजिक बांधिलकी आहे. समाजाप्रती सद्भावना जपणे आणि समाजाला कुटुंबाप्रमाणे सांभाळणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन समाजसेवक हरिदास वानखेडे यांनी केले. भूमी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी कुटुंबातील गरजू मुलींचे संगोपन व शिक्षण वाघोली (पुणे) येथे निवासी प्रकल्पाच्या स्वरूपात अत्यंत प्रभावीपणे राबवले जात आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प यशस्वीपणे पुढे जात असून राज्यभरातील अनेक सेवाभावी पदाधिकारी व दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे या कार्याला बळ मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर हरिदास वानखेडे व ॲडवोकेट प्रियंका शिंदे-वानखेडे यांनी नुकतीच या निवासी प्रकल्पाला भेट दिली.प्रकल्पातील विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांनी त्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक प्रगतीची माहिती घेतली.विद्यार्थिनींचा आत्मविश्वास, शिस्तबद्धता आणि सर्वांगीण विकास पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी बोलताना हरिदास वानखेडे म्हणाले की,''समाज आहे म्हणून आपण आहोत, ही भावना प्रत्येकाने मनात बाळगली पाहिजे.समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी योगदान देणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे.'' ॲडवोकेट प्रियंका शिंदे-वानखेडे यांनी देखील प्रकल्पात राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्व विकासाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.त्यांनी सांगितले की,ग्रामीण भागातील मुलींसाठी अशा निवासी प्रकल्पांमुळे त्यांना सुरक्षित,सकारात्मक आणि प्रगतीशील वातावरण मिळत असून त्यांचा सर्वांगीण विकास घडत आहे.यावेळी हरिदास वानखेडे यांनी आपल्या कुटुंबासह प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबतीत मदत करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. कार्यक्रमादरम्यान वाघोली येथील मॅजेस्टिक मॅनहॅटन फेस-खख परिसरातील बालकलाकार शांतनु मीना वर्मा याच्या आगामी 'श्री निम बाबा करोली' या चित्रपटाच्या पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करून शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी हरिदास वानखेडे,एडवोकेट प्रिया शिंदे वानखेडे, संजय वर्मा,मीना गागरे तसेच प्रकल्पातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे स्वागत व सत्कार डॉ. कैलास पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रकल्प संचालिका व अध्यापिका अनिता पवार यांनी केले.

# कृषी यांत्रिकीरण योजनेचा दोन हजाराहून अधिक महिलांना लाभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** कृषी यांत्रिकीरण योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये एकूण १२ हजार ७१९ लाभार्थ्यांला लाभ देण्यात आला असून त्यापैकी २ हजार १८ महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. त्यांना १४ कोटी ४७ लाख ८८ हजार रुपयाचे अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान योजने अंतर्गत ३ हजार २७० लाभार्थ्यां पैकी ३२७, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेमध्ये ६ हजार ९६ लाभार्थ्यांपैकी १ हजार २१५ आणि राष्ट्रीय कृषी विकास योजना कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ३ हजार ३५३ लाभार्थ्यांपैकी ४७६ महिला लाभार्थ्यांना असे एकूण महिला लाभार्थी आहेत.

केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप अभियान (६०:४० केंद्रः राज्य) तसेच राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना, शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे, विभागनिहाय पीकरचने नुसार गरजेनुरुप व मागणी प्रमाणे पूर्वतपासणी केलेली दर्जे दार कृषी औजारे अनुदानावर उपलब्ध करुन देणे, कृषी उत्पादन प्रक्रियेत अद्ययावत यंत्रसामुग्रीच्या वापरासाठी प्रोत्साहीत करणे या उद्देशाने राबविण्यात येत आहेत.

सन २०२०-२१ पासुन महाडीबीटी संकेतस्थळावर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अनुदानाची रक्कम रक्कम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते. महिला, अनु.जाती, अनु.जमाती, अल्प व अत्यल्प भुधारक यांना ५० टक्के तर इतर लाभार्थ्यांना ४० टक्के अनुदान तसेच किसान ड्रोन खरेदीसाठी कृषि पदवीधर शेतकऱ्यांकरिता अनुदान दर ५० टक्के किंवा रु. ५ लाख व इतर शेतकऱ्यांकरिता अनुदान दर ४० टक्के किंवा ४ लाख यातील कमी असेल ती. सेवा सुविधा केंद्र स्थापनेसाठी भांडवली खर्चाच्या अनुदानाचा दर ४० अनुदान रक्कम कमीत कमी रु. ४ लाख व जास्तीत जास्त रू. १ लाख देण्यात येते, अशी माहिती श्री. कोचोळे यांनी दिली आहे.

## शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत गेल्या दीड वर्षात पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात मोठी मोहीम राबवत तब्बल २१ कोटी रुपयांचा एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स जप्त केला आहे.या कारवाईमुळे गुन्हेगारीवर मोठा आळा बसला असून परिसरात पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी छापे टाकून १६ आरोपींवर तडीपारची कारवाई करण्यात आली, तर ७ जणांवर एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे. तसेच पोलिसांनी १६ पिस्तुले, २३ जिवंत काडतुसे,एक तलवार व कोयता जप्त करून अनेक गुन्हेगारांना अटक केली आहे. शिरूर पोलीस स्टेशन हे भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण क्षेत्रात कार्यरत असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस दल सतत दक्ष आहे. गुन्हेगारांविरोधात कठोर भूमिका घेत गुन्हेगारांना कायद्याचा धाक बसविणे हा उद्देश ठेवून पोलिसांनी प्रभावी कारवाया केल्या आहेत.याशिवाय स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या मदतीने गांजा विक्री करणाऱ्या टोळ्यांवरही कारवाई करत सुमारे १५३ किलो गांजा जप्त करण्यात आला असून सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी शहरातील ४,७५७ संशयित व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करून शांतता राखण्यास मोठे योगदान दिले आहे.कायद्याला आव्हान देणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल, असा इशारा पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी देत नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## पुण्याच्या धनकवडीत जीवघेणे खड्डे

### अपघाताची वाट पाहतेय का महापालिका ?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुण्याच्या धनकवडी परिसरातील के.के. मार्केट समोर ओढ्यालगत, पानपट्टीसमोर आणि महादेव मंदिराच्या बाजूला पावसामुळे तब्बल आठ ते दहा फूट खोल खड्डा पडला असूनही अद्याप प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. या खड्ड्यालागतच असलेल्या पाण्याच्या पाईपलाईनला त्याच खड्ड्या नजीक गळती लागली पाणी सतत वाहत असल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे.या खड्ड्यांवर तात्पुरती मलमपट्टी न करता नागरिकांची,वाहनांची सुरक्षितता लक्षात घेत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज जेष्ठ नागरिकांतून व्यक्त होत आहे. दरम्यान या खड्ड्याचा अंदाज न आल्याने अनेक दुचाकीस्वार या खड्ड्यात पडून जखमी झाल्याच्या घटना देखील घडल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

**नागरिकांचा संतप्त सवाल**



स्थानिक नागरिकांच्या मते,आणखी एक जोरदार पाऊस झाला तर हा खड्डा अधिक मोठा होण्याची शक्यता असून परिसरातील नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. एवढेच नव्हे तर पुण्याई नगर परिसरातही मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, रुबी बेकरीसमोर देखील सुमारे दहा फूट खोल खड्डा निर्माण झाला आहे. या संदर्भात अनेकदा बातम्या प्रसिद्ध होऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे संबंधित खड्ड्यांच्या नजीकच ओढा वाहत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली असून जमिनीची धूप वाढत असून, कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच महापालिका जागी होणार का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, ज्येष्ठ समाजसेविका वर्षा नाईक यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या धोकादायक खड्ड्यांची त्वरित दुरुस्ती करावी, अन्यथा मोठी दुर्घटना टाळता येणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# पुण्यात वैद्यकीय क्षेत्रातील ऐतिहासिक यश

### मुखाच्या कर्करोग रुग्णावर संपूर्ण जिभेची यशस्वी पुनर्रचना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुण्यातील वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. स्वारगेट येथील अपोलो हॉस्पिटल येथे मुखाच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या एका रुग्णावर अत्यंत जटिल आणि अत्याधुनिक प्रोफुंडा आर्टरी परफोरेटर (झअझ) फ्लॅप तंत्राचा वापर करून संपूर्ण जिभेची यशस्वी पुनर्रचना (ढोंरश्र ढेपर्सीश ठशलेपींऔलींळेप) करण्यात आली. पुण्यात अशा प्रकारची ही पहिलीच शस्त्रक्रिया असल्याचे मानले जात आहे. सदर रुग्णाला मुखाच्या कर्करोगामुळे संपूर्ण जीभ काढण्याची (ढोंरश्र ऱ्ङ्गीशलींू) तातडीची आवश्यकता निर्माण झाली होती. डोके व मान कर्करोग तज्ज्ञ डॉ. राम पाटील यांनी कर्करोगग्रस्त भाग काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. त्यानंतर, प्लास्टिक व पुनर्रचनात्मक शल्यविशारद डॉ. अमित मुळे यांनी अत्याधुनिक मायक्रोव्हॅस्क्युलर तंत्राचा वापर करून 'पीएपी' फ्लॅपडरे जिभेची यशस्वी पुनर्रचना केली.

ही शस्त्रक्रिया अत्यंत तांत्रिक कौशल्याची मागणी करणारी असून यामध्ये शरीराच्या मांडीतील ऊतक (झऑर्षीपवर अऔशऑू झशऑेषेऑरींऑ ऱ्थ्रर) घेतले जातात. मायक्रोस्कोपखाली सूक्ष्म रक्तवाहिन्या जोडण्याच्या क्लिष्ट प्रक्रियेडरे नवीन जीभ तयार करण्यात आली. या अत्याधुनिक पद्धतीमुळे रुग्णाला भविष्यात बोलणे, अन्न गिळणे आणि दैनंदिन जीवनातील अनेक क्रिया अधिक सुलभ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या जटिल शस्त्रक्रियेत मुख्य भूलतज्ञ डॉ. बिकाश साहू आणि डॉ. प्रीती अदाते त्यांचे महत्वपूर्ण योगदान लाभले . तसेच डॉ. सम्राट शाह (फिजिशियन) आणि डॉ. राहुल ढाके (ऑन्कोपॅथोलॉजिस्ट) यांनी उपचार प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविला. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे पुणे शहरात प्रगत मायक्रोव्हॅस्क्युलर पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. यामुळे मुखाच्या कर्करोग रुग्णांना केवळ कर्करोगमुक्त न करता, त्यांना दर्जेदार आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याची नवी आशा मिळाली आहे.



## पुणे जिल्हा देशात व्दितीय क्रमांकावर आठव्या राष्ट्रीय पोषण पंधरवडा जनजागृती उपक्रमाची प्रभावी अमंलबजावणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या आठव्या राष्ट्रीय पोषण पंधरवाडयातील जनजागृती उपक्रमामध्ये पुणे जिल्ह्याने देशात द्वित्तीय क्रमांक पटकावला आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे.

केंद्र शासनाच्या सुचनेनुसार ९ एप्रिल २०२६ पासून जिल्ह्यात सर्व अंगणवाडी केंद्रामधे हे उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पंधरवाडयात आतापर्यंत २ लाख ८८ हजार ४३४ उपक्रम राबविण्यात आले आहे. याच पार्श्वभुमीवर जिल्ह्याने देशात व्दितीय क्रमांक पटकावला आहे. अहिल्यानगर जिल्हा प्रथम तर बिहार राज्यातील मुझफ्फरपुर जिल्ह्याने तिसऱ्या क्रमांक पटकाविला आहे.

या पंधरवाडयाचे राष्ट्रीय स्तरावरील उद्घाटन केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री अन्नपुर्णादेवी यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले होते. जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या हस्ते या कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. बालकाच्या आयुष्यातील पहिली सहा वर्ष पोषण व शिक्षणासाठी अत्यंत महत्वाची असतात. याच अनुषंगाने 'बालकांच्या जीवनातील पहिल्या ६ वर्षातील मेंदूचा विकास' या मुख्य संकल्पनेवर यंदाचा पंधरवडा केंद्रित आहे. यामधे माता व बालकांचे पोषण, शुन्य ते तीन वर्ष वयोगटातील बालकांच्या मेंदुच्या विकासाकरीता पुर्व उद्दीपन, तीन ते सहा वर्ष वयोगटातील मुलांसाठी खेळ आधारीत पूर्व शालेय शिक्षण, बालकांचा स्क्रिनवरील वेळ कमी करण्यासाठी पालकांची भुमिका व अंगणवाडी केंद्र सक्षम करण्यासाठी समुदायाचा सहभाग वाढविणे या प्रमुख विषयांवर भर दिला.

# 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टच्या मोफत आरोग्य सेवा केंद्राचे लोकार्पण

### जय गणेश रुग्णसेवा अभियान ; विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगिकारून सातत्याने समाजासाठी कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट तर्फे साकारलेल्या मोफत आरोग्य सेवा केंद्राचे लोकार्पण झाले. सारसबागेजवळील बाबुराव सणस मैदानासमोर असलेल्या हिराबाग कोठी परिसरात हे केंद्र उभारण्यात आले आहे. यामध्ये रुग्णांना विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार आहेत.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट तर्फे साकारलेल्या मोफत आरोग्य सेवा केंद्राचे लोकार्पण झाले. सारसबागेजवळील बाबुराव सणस मैदानासमोर असलेल्या हिराबाग कोठी परिसरात हे केंद्र उभारण्यात आले आहे. यावेळी उपस्थित मान्यवर. छाया :गणेश कुंभकर्ण

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने उभारलेल्या या केंद्राचे उद्घाटन राज्याच्या आरोग्य सेवा विभागाचे संचालक डॉ.विजय कंदेवाढ यांच्या हस्ते झाले. यावेळी पुणे मनपा आरोग्य प्रमुख डॉ.नीना बोराडे, आयएमए चे डॉ.विरेंद्र ओस्तवाल, डॉ.अमरीश दरक, डॉ.संदेश पटवर्धन, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह आरोग्य क्षेत्रातील मान्यवर, ट्रस्टचे पदाधिकारी व मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी हे येथील व्यवस्था पहात आहेत.

डॉ. विजय कंदेवाढ म्हणाले, आज आरोग्यासाठी खूप काही करण्याची आवश्यकता आहे. ट्रस्टने उभारलेल्या का मोफत आरोग्य केंद्राचा लाभ गोरगरीब जनतेला होणार आहे. मोबाईल आरोग्य व्हॅन ही उत्तम संकल्पना असून दात, डोळे आणि कानाची तपासणी दुर्गम, ग्रामीण भागात करून आरोग्य सेवा देता येणार आहे. हेमंत रासने म्हणाले, हजारो रुग्णांना दिलासा देण्याचे काम जया गणेश रुग्णसेवा अभियानाच्या माध्यमातून होत आहे. शासकीय व धर्मादाय यंत्रणांनी यामध्ये ट्रस्टला मोठे सहकार्य केले आहे. पुणे शहर आणि आपले महाराष्ट्र राज्य निरोगी राहावे, हा यामागील उद्देश आहे. सर्वांना आरोग्यसेवा तत्परतेने मिळतील असा प्रयत्न यामाध्यमातून केला जाणार आहे.

मोफत आरोग्य सेवा केंद्र हे सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते ५ पर्यंत खुले राहणार असून येथे विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार आहेत. यामध्ये विविध रक्त तपासणी, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, जनरल ओपीडी, हृदय ईसीजी, दंत तपासणी, दात काढणे, लहान बालकांकरिता लसीकरण सुविधा, कृत्रिम हात व पाय वाटप नोंदणी, श्रावण तपासणी होणार आहे. याकरिता तज्ज्ञ डॉक्टरांची टीम येथे कार्यरत असणार आहे. अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्रमांक ९८८१५१६५१७/ ९९२३५१६५१७ या क्रमांकावर संपर्क साधावा. तरी रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी केले आहे.

## नारायणगावात दोन गावठी कट्टे व जिवंत काडतुसे जप्त; तिघांना अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नारायणगाव (ता. जुन्नर) :** बेकायदेशीर अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून अटक केली असून त्यांच्या ताब्यातून दोन गावठी कट्टे (पिस्टल) व जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पुणे ग्रामीण जिल्ह्यात बेकायदेशीर शस्त्रांवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक संदीप गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांनी पथकाला सूचना दिल्या होत्या. जुन्नर विभागात पेट्रोलिंगदरम्यान सहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांना गोपनीय माहिती मिळाली की, राहुल सुरेश साळवे (रा. साकोरी तर्फे बेल्हे, ता. जुन्नर) हा त्याच्या दोन साथीदारांसह कारफाटा, निमगावसावा येथे येणार असून त्याच्याकडे गावठी कट्टे आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष सापळा रचून राहुल साळवे, दर्पण सुरेश पवार (वय २२, रा. नारायणगाव) व तेजस संदीप मातेले (वय २१, रा. नारायणगाव) यांना ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान राहुल साळवे व तेजस मातेले यांच्या कमरेला खोसलेले दोन गावठी कट्टे व दोन जिवंत काडतुसे आढळून आली.




या प्रकरणी आरोपींकडून गावठी कट्टे, काडतुसे व चक ०६ इए ४६२६ क्रमांकाची ईर्टिगा कार असा एकूण सुमारे ५ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत नारायणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींची वैद्यकीय तपासणी करून त्यांना पुढील कारवाईसाठी नारायणगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे व उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, स.पो.नि. महादेव शेलार, स.पो.नि. प्रवीण सपांगे, स.फौ. दीपक साबळे, पो.हवा. संदीप वारे व अक्षय नवले यांच्या पथकाने केली.


**जाहीर निविदा सुचना क्र. १/२०२६-२७**

**ग्रामपंचायत महुडे बु. ता. भोर जि.पुणे**

ग्रामपंचायत महुडे बु. ता. भोर च्या वतीने सरपंच / ग्रामपंचायत महुडे बु. ता. भोर यांचे तर्फे खालील कामाचे नावा समोर नमुद केले प्रमाणे बांधकाम विभागा कडील योग्यत्या कंत्राटदाराकडून खाली नमुद कामाच्या सिलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. को-या निविदेचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय महुडे बु. ता. भोर यांच्या कार्यालयातुन दि. २३/०४/२०२६ सकाळी १०.०० वा पासून ते दि. ०७/०५/२०२६ दु.२.०० वाजेपर्यंत देणेत येतील. सिलबंद भरलेल्या निविदा ग्रामपंचायत महुडे बु. ता. भोर येथे दि. ०७/०५/२०२६ दु. ४.०० पर्यंत स्विकारणेत येतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी समक्ष समिती समोर उघडणेत येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | निविदा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | एकूण अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | आवश्यक कंत्राट दार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महुडे बु. खुडेवस्ती पाणीटाकी व वितरण व्यवस्था करणे. ता. भोर | अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे. | ७,००,०००/- | २२४/- | २% | ६ महिने | वर्ग १ ते ८ |
| २ | महुडे बु. गायकवाड वस्ती पाईप लाईन व वितरण व्यवस्था करणे. ता. भोर | अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या वसस्तीचा विकास करणे, | ८,००,०००/- | २२४/- | २% | ६ महिने | वर्ग १ ते ८ |

**सरपंच/प्रशासक** ग्रामपंचायत महुडे बु. ता. भोर — **ग्रामपंचायत अधिकारी** ग्रामपंचायत महुडे बु. ता. भोर



**बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या कसबा, बारामती जि.पुणे**

**फोन नं. ०२११२-२९९३७२, मो नं.९५४५४५००३५**

ई मेल : btd.pur@gmail.com

**ई टेंडर नोटीस**

आमच्या बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघाच्या नंदन पशुखाद्य विभागासाठी आवश्यक मटेरिअल खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे ई. टेंडर मागविण्यात येत आहेत

| अ.क्र | कामाचा तपशील | नग | बयाणा रक्कम रु | टेंडर फी (ना परतावा रक्कम) |
|---|---|---|---|---|
| १ | Tender of Supply of Bag Stacker 30 Feet in Nandan Cattle Feeds. | 1 Job | १०,०००/- | १,०००+ जी.एस.टी (१८%) |
| २ | Tender of APV Gaulin Homogenizer Spares in Nandan Nandan Dairy. | 1 Job | १०,०००/- | १,०००+ जी.एस.टी (१८%) |

सदर निवेदेतील मालाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी, शर्थी इत्यादी माहिती दि. २३/०४/२०२६ सकाळी ११.०० पासून संघाच्या www.indiaengineering.com/baramatitender या वेबसाईटवरती गेल्यानंतर Currently Online Tenders ला क्लिक केल्यास पहावयास मिळतील. सदर ई टेडर प्रक्रिया अंतर्गत निविदा दि. २३/०४/२०२६ सकाळी ११.०० ते दि. २८/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत ई टेडर पद्धतीने वेबसाईटवरूनच भरता येईल. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

**डॉ. योगेश वा. राणे** व्यवस्थापकीय संचालक — **दत्तात्रय सं. वावगे** व्हा. चेअरमन — **संजय.रा. कोकरे** चेअरमन

**बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघ**

## द•ख•ल

### लक्ष्यवेध व मंथन परीक्षेत इर्रीगेशन कॉलनी शाळेचे यश

**लिंपणगाव** : राज्यस्तरीय लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत इर्रीगेशन कॉलनी शाळेतील मुलांनी उत्तुंग यश मिळवले आहे. शाळेतील ५ मुलांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. या मध्ये इयत्ता पहिलीतील देवांश संग्राम शिंदे याने १३२गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. तसेच सार्थक भाऊसाहेब मांडे व कु. दिव्या किरण कटारे या पहिलीतील मुलांनी प्रत्येकी ११८ गुण मिळवून तालुका गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. इयत्ता दुसरीतील संस्कार दिनेश घाडगे याने १२८ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. तसेच कु. वेदिका युवराज मांडे हिने १२४ गुण मिळवून तालुका गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. तसेच तिने मंथन प्रज्ञाशोध परीक्षेतही ११८गुण मिळवून मंथन गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.या स्पर्धा परीक्षेसाठी श्री. दरेकर सर व मुख्याधपाक श्री गिरमकर सर यांचे मार्गदर्शन लाभले. मुलांच्या स्पर्धा परीक्षा तयारी साठी सर्व पालकांनी सहकार्य व मार्गदर्शन केले. शाळेला मिळालेल्या यशा बद्दल शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. अनिल शिंदे, उपाध्यक्षा सौ. निलीमा झिटे, सर्व पालक,लोकनियुक्त सरपंच श्री. प्रमोद शिंदे,सर्व ग्रामपंचायत सदस्य, भा ज पा महिला आघाडीच्या सौ देवयानी शिंदे,शिक्षण प्रेमी, ग्रामस्थ यांनी मुलांचे व इर्रीगेशन शाळेचे विशेष अभिनंदन केले आहे.

### जल जीवन मिशन योजना फेल भातोडी पारगावात 'शोले स्टाईल' आंदोलन

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील भातोडी पारगाव येथे केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन योजना प्रत्यक्षात अपयशी ठरत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. गावातील नळ कोरडे, पाण्याच्या टाक्या रिकाम्या आणि नागरिक पाण्यासाठी त्रस्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त ग्रामस्थांनी आज पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र निषेध व्यक्त केला.

गेल्या दोन वर्षांपासून गावात नियमित पाणीपुरवठा सुरू व्हावा यासाठी सरपंच विक्रम गायकवाड यांनी गावकऱ्यांसह सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही योजना अद्याप अपूर्णच असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. आज आंदोलनादरम्यान ग्रामस्थांनी घोषणाबाजी करत जल जीवन मिशन योजनेचा निषेध नोंदवला व तात्काळ काम पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पोटे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देत सांगितले की, आठ दिवसांच्या आत पाणीपुरवठा सुरू झाला नाही तर जिल्हा परिषद कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल.तसेच सरपंच विक्रम गायकवाड यांनीही कठोर भूमिका घेत, लवकरात लवकर योजना पूर्ण झाली नाही तर टोकाचा निर्णय घ्यावा लागेल, असा इशारा दिला.

### स्पर्धा परीक्षेत केडगावच्या सरस्वती प्राथमिक विद्यामंदिरची गरुड भरारी

**अहिल्यानगर** : सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर, केडगाव येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ मधील मंथन राज्यस्तरीय, स्टुडन्ट टॅलेंट सर्च व लक्ष्यवेध प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. या स्पर्धांमध्ये तब्बल ११ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले असून राज्य, जिल्हा व केंद्र स्तरावर मानांकित क्रमांक पटकावले आहेत. इयत्ता पहिलीतील देवांश महेश जाधव याने मंथन राज्यस्तरीय परीक्षेत १३४/१५० गुणांसह जिल्ह्यात चौथा, तर स्टुडन्ट टॅलेंट सर्चमध्ये १३८/१५० गुणांसह सहावा क्रमांक मिळवला. सृष्टी श्रीकांत जाधव हिने लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत १२६/१५० गुणांसह केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता दुसरीतील आराध्या सोमनाथ जाधव हिने लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत १४६/१५० गुणांसह राज्यात तिसरा, स्टुडन्ट टॅलेंट सर्चमध्ये १४०/१५० गुणांसह जिल्ह्यात पाचवा, तर मंथन परीक्षेत १३०/१५० गुणांसह केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून त्रिसूत्री यश मिळवले. श्रेया संजय मरकड हिने लक्ष्यवेधमध्ये जिल्ह्यात चौथा व मंथनमध्ये केंद्रात पाचवा क्रमांक मिळवला. आरोही राहुल माताडे हिने मंथनमध्ये केंद्रात आठवा क्रमांक पटकावला. ईश्वरी सागर कोठुळे हिने स्टुडन्ट टॅलेंट सर्चमध्ये जिल्ह्यात पाचवा, लक्ष्यवेधमध्ये केंद्रात तिसरा व मंथनमध्ये केंद्रात नववा क्रमांक मिळवला. अंजली नवनाथ मळेकर हिने लक्ष्यवेध परीक्षेत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला.

### प्रा. मेधाताई काळे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**अहिल्यानगर** : स्वर्गीय माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने यावर्षीचा शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिका तथा महिला बँकेच्या संस्थापिका प्रा. मेधाताई यशवंतराव काळे यांना प्रदान करण्यात आला. कायनेटिक चौक येथील यश ग्रॅण्ड हॉटेल येथे आयोजित या सोहळ्याला प्रा. शशीकांत गाडे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विवेक भापकर, अध्यक्ष मुकेश माधवराव मुळे, उपाध्यक्ष दत्ता पाटील नारळे, सचिव प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, खजिनदार बजरंग पाडळकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डॉ. लक्ष्मण कदम, प्राचार्य हनुमंतराव कणसे, प्रा लालचंद हराळ, सुनील म्हस्के, डॉ महेश मुळे यांच्यासह प्रतिष्ठानचे अनेक सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय माधवराव मुळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १२ व २४ वर्षाच्या आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाचा मार्ग मोकळा

## शासन स्तरावर आदेश पारित होण्याच्या हालचाली शिक्षकेतर महासंघाला न्यायालयीन लढ्यात मोठे यश!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या आदेशान्वये शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ ऑक्टोबर २००६ पासून खाजगी शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांचा १२ व २४ वर्षाच्या आश्वासित प्रगती योजनेचा शासन आदेश त्वरित निर्गमित करण्याचे आदेश मुंबई मंत्रालयाचे कक्ष अधिकारी वित्त विभाग यांनी शासनाचे शालेय शिक्षण उपसचिवांना १३ एप्रिल २०२६ रोजी दिले आहेत. या आदेशामुळे आता शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा १२ व २४ वर्षाचा प्रलंबित मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान राज्य शिक्षकेतर महासंघाच्या वतीने मा. उच्च न्यायालयात शिक्षकेतरांच्या या १२ व २४ वर्षाच्या आश्वासित प्रगती योजना१ ऑक्टोबर २००६ पासून लागू करावी, यासाठी महासंघाने न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेचा उच्च न्यायालयाने निकाल देत शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही १२ व २४ वर्षाची आश्वासित प्रगती योजना ही १ ऑक्टोबर २००६ पासून पूर्वलक्षी पूर्वप्रभावाने लागू करावी, असे न्यायालयाने निकाला दरम्यान दिला. निकालाचा आधार घेत शिक्षकेतर महासंघाचे राज्य अध्यक्ष वाल्मीक सुरासे यांच्यासह महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई मंत्रालयाचे कक्ष व वित्त अधिकारी यांना दिनांक २७ मार्च २०२६ रोजी शासन आदेश पारित करण्यासाठी पत्र दिले होते. आता कक्ष व वित्त अधिकारी यांनी शालेय शिक्षण व क्रीडा सचिवांना तातडीने शासन आदेश काढून या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना द्यावा, असा आदेश कक्ष अधिकाऱ्यांनी दिला आहे.

त्यामुळे आता या शासन आदेश प्रक्रियेला वेग आला असून, राज्य शिक्षकेतर महासंघाला देखील न्यायालयीन लढ्यात मोठे यश मिळाले आहे. आता सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही या आश्वासित प्रगती योजनेचा मोठा लाभ मिळणार असून, मागील फरक व पेन्शनमध्ये देखील त्याची वाढ होणार असल्याने राज्यातील शिक्षकेतरांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून, महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वागत केले आहे.

## श्रीगोंद्यात पाणीपट्टीवरून नागरिकांचा संताप, आंदोलनाचा इशारा

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरात पाणीपुरवठा नियमित नसताना नागरिकांकडून आकारली जाणारी पाणीपट्टी मात्र 'फुल्ल ऑन' सुरू असल्याने संतापाची लाट उसळली आहे. पाणी कमी, बिल जास्त हा कसला हिशोब? असा थेट सवाल करत स्थानिक नागरिकांनी नगरपरिषदेला जाब विचारला आहे.

श्रीगोंदा शहरातील रहिवाशी ज्ञानदेव प्रभाकर शिरवळे (सामाजिक कार्यकर्ते) व इतर नागरिकांनी नगरपरिषदेकडे सादर केलेल्या निवेदनात गंभीर मुद्दे मांडले आहेत. शहरात यू.आय.डी.एस.एस.एम.टी. पाणी योजनेद्वारे पुरवठा होत असला, तरी प्रत्यक्षात नागरिकांना दररोज पाणी मिळत नाही. उलट, महिन्यातील सुमारे ३६५ दिवसांच्या हिशोबाने तब्बल छ१४०० पर्यंत पाणीपट्टी आकारली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.श्रीगोंद्यात नळ कोरडा, पण बिल भरपूरयेत असल्याचा आरोप शिरवाळे यांनी केला आहे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या पाणीपुरवठा फक्त सुमारे १८२ दिवसच केला जातो. पाइपलाइन फुटणे, वीजपुरवठा खंडित होणे अशा कारणांमुळे अनेक दिवस पाणीच येत नाही. तरीही नागरिकांकडून पूर्ण वर्षाची आकारणी होत असल्याने ही थेट अन्यायकारक वसुली असल्याचा आरोप आहे.त्यांच्यासह नागरिकांची मागणी अशी आहे ते म्हणतात प्रत्यक्ष मिळालेल्या पाण्याच्या दिवसांनुसारच पाणीपट्टी आकारावी,अन्यायकारक वसुली तात्काळ थांबवावी,२०२६-२७ आर्थिक वर्षापासून सुधारित पद्धती लागू करावीनाही तर रस्त्यावर येऊ!नगरपरिषदेकडून या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. गरज पडली तर महिला व नागरिकांसह थेट नगरपरिषदेसमोर मोर्चा काढू, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## पी.एफ. थकबाकीवर श्रीगोंदा कामगारांचा एल्गार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : श्रीगोंदा नगरपरिषदेतील कंत्राटी कामगारांचा मागील दोन वर्षांपासून थकीत असलेल्या भविष्य निर्वाह निधी (पी.एफ) प्रकरणी संताप उफाळून आला असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) गटाच्यावतीने आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली आणि दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधून कामगारांच्या प्रलंबित मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.

कामगारांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही अनेक वेळा तोंडी व लेखी पाठपुरावा करण्यात आला होता. दिनांक २९ जुलै २०२५ रोजी संबंधित कार्यालयाने प्रत्येक महिन्याला पी.एफ देयकासोबत दिला जाईल असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसून, दोन वर्षांपासून पी.एफ थकीतच असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे संतप्त झालेल्या कामगारांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) गटाच्या माध्यमातून दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्पष्ट इशारा देत सांगितले की, दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सर्व कामगार काम बंद ठेवून आमरण उपोषण सुरू करण्यात येणार आहे.

## भाळवणीतील मुरूमप्रकरणी लॅब चाचणीसाठी नमुना पाठवण्याची मागणी



**अहिल्यानगर** : पारनेर तालुक्यातील मौजे भाळवणी येथील गट क्रमांक ३७ पी मधील मुरूम उत्खनन प्रकरण आता चांगलेच तापले असून, संबंधित मुरूमाची लॅब चाचणी करण्यासाठी नमुना तात्काळ पाठवावा, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पारनेर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले असून, आदेश तातडीने न झाल्यास तहसील कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

समितीच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार, मौजे भाळवणी येथील गट क्रमांक ३७ पी मध्ये अवैध मुरूम उत्खनन सुरू असल्याची तक्रार दि. ५ एप्रिल २०२६ रोजी सहाय्यक संशोधन अधिकारी, जिल्हा प्रयोगशाळा, अहिल्यानगर यांच्याकडे करण्यात आली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ९ एप्रिल रोजी संबंधित विभागाकडून पत्र देण्यात आले असून, मुरूम नमुन्याची प्रयोगशाळा चाचणी करण्यासाठी आवश्यक शुल्क भरून नमुना सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ (सा.बा.) नाशिक तसेच जिल्हा प्रयोगशाळा (सा.बा.) अहिल्यानगर यांनी तहसीलदार पारनेर व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पारनेर यांना पत्राद्वारे कळविले आहे की, गट क्रमांक ३७ पी मधील मुरूमाचा नमुना अधिकृत पद्धतीने संकलित करून प्रयोगशाळेत पाठवावा.

त्यानुसार, समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी चाचणी शुल्क भरण्यास तयारी दर्शवली आहे.

तसेच, भाळवणी परिसरातील मंडळाधिकारी व तलाठी यांना अधिकृत प्रतिनिधी म्हणून नियुक्त करून त्यांच्या उपस्थितीत तसेच समितीच्या प्रतिनिधींसमवेत मुरूम नमुना संकलित करून लॅब चाचणीसाठी पाठविण्याचे आदेश तहसील कार्यालयाकडून तात्काळ देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या प्रकरणात प्रशासनाने वेळ न दवडता निर्णय घ्यावा, अन्यथा पारनेर तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## कर्जत पंचायत समितीच्या कामासबंधी आ. रोहित पवार यांची आढावा बैठक

### नागरिकांच्या प्रश्नांवर अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावत घेतले फैलावर




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : प्रशासनाने नियमावर चालताना दुजाभाव करू नये. कोणाला खुश करण्यासाठी कामात अडथळा आणणे चुकीचे आहे. कोण माणूस कोणाचा आहे याच्याशी आपल्याला वैयक्तिक काही देणे घेणे नाही. नियमात असेल तर काम झालेच पाहिजे. याची तक्रार असेल म्हणून रद्द करणे ठीक नव्हे. उद्या कोणी म्हणेल बीडीओ पैसे खातो. मी पण तेच म्हणायचे का ? असा सज्जड इशाराच आमदार रोहित पवार यांनी पंचायत समितीच्या आढावा बैठकीत दिला. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी पंचायत समितीच्या कार्यपद्धतीवर टीका करीत जाब विचारला. या बैठकीस गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

आमदार रोहित पवार यांनी कर्जत पंचायत समितीत अधिकाऱ्यांची बुधवार, दि २२ रोजी बैठक घेत विविध कामांचा आढावा घेतला. नागरिकांच्या प्रश्नांवर होत असलेल्या विलंबाबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत काही महत्वाच्या कामातील त्रुटींवरून खडेबोल देखील सुनावले. शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना वेळेत मिळावा आणि प्रलंबित कामे लवकर पूर्ण करावीत अशा सूचना दिल्या. यावेळी अनेक नागरिकांनी, लाभार्थ्यांनी यासह पदाधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, शेतीविषयक अडचणी तसेच वैयक्तिक प्रश्न आमदार रोहित पवार यांच्या समोर मांडले. त्यावर तात्काळ संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा अभिप्राय देखील घेतला. लाभार्थ्यांची त्रुटी असेल तर त्यांनी त्या त्वरित पूर्ण करून सादर करण्याचे सांगितले. मात्र सर्व कागदपत्रे पूर्ण असून केवळ राजकीय द्वेषभावना मनात ठेवून प्रलंबित ठेवलेल्या प्रकरणावर आमदार पवार चांगलेच संतप्त झाले. प्रशासनाने सर्वसामान्य जनतेच्या हिताचे काम करावे. सत्ता कोणाची असो सर्वसामान्यांना न्याय देण्याचे प्रामाणिक काम अधिकाऱ्यांनी पार पाडावे अशी तंबी दिली. या बैठकीस जेष्ठनेते बाळासाहेब साळुंके, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, रघुआबा काळदाते, दिलीप जाधव, गणेश सुद्रीक, भूषण ढेरे यांच्यासह अनेक लाभार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाबासाहेबांचा जीवनप्रवास केवळ संघर्ष नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठीचा लढा होता : आंधळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास हा केवळ एका व्यक्तीचा संघर्ष नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठीचा लढा होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले, परदेशात जाऊन उच्च पदव्या मिळवल्या आणि भारताच्या संविधानाची निर्मिती करून देशाला नवा मार्ग दाखविल्याचे प्रतिपादन पाटबंधारे मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र आंधळे यांनी केले.

सावेडी, गुलमोहर रोड येथील आम्रपाली मंगल कार्यालयात महात्मा ज्योतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्याख्यानात मार्गदर्शन करताना आंधळे बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व वंदन करून करण्यात आली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रा. निवृत्ती आरु, संपर्क प्रमुख सुधाकर जाधव, स्वागताध्यक्ष एन. एम. पवळे, सचिव सी. पी. क्षेत्रे, उपाध्यक्ष पी. पी. खंडागळे, शिरीष जाधव, सहसचिव बी. आर. सातपुते, गिरीष गायकवाड, भिमराव घोडके, राजेंद्र थोरात, डॉ. प्रताप घोडके, इंजि. निखिल आरु, डॉ. अमित पवळे, इंजि. किरण पगारे, अजय साळवे, ड. सुबोध जावधे, सतीष राजगुरु, अविनाश भोसले, मनेष कांबळे, अजित घोडेस्वार, डॉ. तुरुकमाने, डॉ. बी. एन. रणनवरे, के. के. जाधव, मार्शल भिंगारदिवे, मनोहर पाटोळे, संजय शिंदे, डॉ. शैलेश खंडागळे, रमेश जगताप, अर्जुन कांबळे, राजु थोरात, विजय पाटोळे आदी उपस्थित होते.

या वेळी पाटबंधारे मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र आंधळे यांनी मार्गदर्शन करताना बाबासाहेबांचा बालपणापासूनचा संघर्षमय जीवनप्रवास अत्यंत प्रभावीपणे उलगडून दाखवला. त्यांनी अस्पृश्यता, सामाजिक रूढी आणि परंपरांच्या विळख्यात अडकलेल्या समाजाला बाबासाहेबांनी दिलेल्या दिशादर्शक कार्याचा सखोल आढावा घेतला.

आंधळे म्हणाले की, बाबासाहेबांना वाचनाची गोडी त्यांच्या वडिलांनी लावली. त्याच वाचनाच्या बळावर त्यांनी जगभरातील ज्ञान आत्मसात केले. बुद्ध, धम्म आणि मानवतेच्या मूल्यांचा स्वीकार करून त्यांनी समाजाला समतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांची गरज आजही तितकीच आहे. तसेच त्यांनी नमूद केले की, कोलंबिया विद्यापीठात बाबासाहेबांचा 'ज्ञानाचे प्रतीक' म्हणून पुतळा उभारण्यात आला आहे, यावरून त्यांच्या ज्ञानाचा जागतिक स्तरावर स्वीकार झाल्याचे स्पष्ट होते. जातिव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि भारताच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य आजही मार्गदर्शक ठरत आहे. बाबासाहेबांच्या संघर्षात त्यांच्या अर्धांगिनी रमाबाई आंबेडकर यांचा त्यागही त्यांनी अधोरेखित केला.

# राज्यव्यापी बेमुदत संपाला हिवताप कर्मचाऱ्यांचा पाठिंबा

## १७ लाख कर्मचारी आंदोलनात प्रलंबित मागण्यांसाठी संघर्ष तीव्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : राज्यातील सरकारी, निमसरकारी तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली सुमारे १७ लाख कर्मचारी दि. २१ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संपावर गेले असून, प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी निर्णायक पवित्रा घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी मध्यवर्ती संघटना (र.न.२९३४/८४) ही शासनमान्य राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेशी संलग्न असून, संघटना पदाधिकारी तसेच राज्यातील हिवताप कर्मचारी या संपात कालपासूनच सहभागी झालेले आहेत. हिवताप संघटनेच्या वतीने दि. ३ एप्रिल २०२६ रोजी मांडण्यात आलेल्या मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (ठछझड) अंमलबजावणीसंदर्भात तात्काळ स्पष्टीकरणात्मक अधिसूचना जारी करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

यासह हिवताप विभागातील दि.१६ फेब्रुवारी २०२४ रोजीचा नियुक्ती प्राधिकारी बाबतचा शासन निर्णय रद्द करावा, सुधारित आकृतीबंध, नवीन सेवाप्रवेश नियम लागू करावेत, हिवताप विभागाचे जि.प.कडे होणारे हस्तांतरण रोखावे, तालुका आरोग्य कार्यालयात आरोग्य निरीक्षक व आरोग्य कर्मचारी यांना पदस्थापना द्यावी, कायम प्रवास भत्त्यात वाढ करावी, पदोन्नती व अन्य प्रलंबित प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशा विविध मागण्या संघटनेने मांडल्या आहेत.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनांकडून देण्यात आला आहे. शासन व प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, संपाच्या दुसऱ्या दिवशी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हिवताप कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी जोरदार निदर्शने केली. या आंदोलनात राज्य सरचिटणीस पुरुषोत्तम आडेप, निमंत्रक राज्य सरकारी निमसरकारी राज्य सरकारी समन्वयक समितीचे रावसाहेब निमसे, तसेच सुभाष तळेकर, अशोक मसाळ, अरुण लांडे, गोरक्ष कर्डिले, वैभव झरेकर, महेश पवार व हिवताप विभागातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.२३ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# सशस्त्र चोरट्यांचा धुमाकूळ

## आश्वी परिसरात पोलीस सतर्क, ग्रामस्थांना सुरक्षेचे मार्गदर्शन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून सशस्त्र चोरट्यांनी उच्छाद मांडला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आश्वी पोलीस यंत्रणा आता पूर्णपणे सक्रिय झाली आहे. चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आणि ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतापपूर येथे सुरक्षा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी पहाटे चोरट्यांनी उंबरी बाळापूर आणि आश्वी बुद्रुक येथे तीन ते चार ठिकाणी सशस्त्र चोऱ्या केल्या होत्या. यामध्ये लाखोंची रोकड आणि सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले. विशेष म्हणजे, उंबरी येथील घटनेत एका महिलेच्या कानाला गंभीर दुखापत झाली.

त्या पाठोपाठ रविवारी पहाटे कोंची गावातील एका घरातून रोकड चोरीला गेल्याने पुन्हा खळबळ उडाली. या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. २०) सायंकाळी प्रतापपूर येथील बैठकीत बोलताना सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी नागरिकांना सुरक्षेबाबत कानमंत्र दिले. नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने घरात मोठी रोकड किंवा मौल्यवान दागिने ठेवणे टाळावे आणि शक्य असल्यास त्या वस्तू बँकेच्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवाव्यात, असा सल्ला त्यांनी दिला. तसेच आपल्या परिसरात कोणतीही अनोळखी व्यक्ती किंवा संशयास्पद हालचाल दिसल्यास तातडीने शेजाऱ्यांना आणि पोलिसांना संपर्क करावा. विशेष म्हणजे, रात्री झोपताना दुचाकी आणि चारचाकी वाहणाच्या चाव्या काढून घ्याव्यात. दरवाजे उघडे न ठेवता त्यांना कुलुप लावावे. तसेच घराच्या मुख्य दरवाजाला आतून एक परात उभी करून ठेवावी, जेणेकरून कोणी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केल्यास परात पडून होणाऱ्या आवाजाने घरातील सदस्य तात्काळ सावध होतील, असेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक दिपक बर्डे यांनी देखील नागरिकांना सुरक्षेबाबत सूचना दिल्या. दरम्यान, या बैठकीत ग्रामस्थांनी परिसरात रात्रीची गस्त वाढवावी आणि विशेष तपास पथके नेमून या सशस्त्र चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी आग्रही मागणी केली.

# ऐन उन्हाळ्यात तहानलेल्या गावांना पैठण उजवा कालव्यातील पाणी आवर्तनाचा मोठा दिलासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव** : दिवसेंदिवस उन्हाची प्रचंड प्रमाणात तीव्रता वाढत चालली असून या वाढत्या तीव्रतेमुळे जमिनीतील पाणी पातळीही खालावली गेली असल्यामुळे शेवगाव तालुक्यातील अनेक गावातील पाण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनत चालला असतानाच पैठण येथील नाथसागराच्या जलाशयातून उजव्या कालव्यात सुटणारे उन्हाळी पाणी आवर्तन सोमवार ( दि.२० ) रोजी सुटले असल्यामुळे या सुटलेल्या आवर्तनामुळे असंख्य गावातील शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

पैठण उजवा कालव्याअंतर्गत शेवगाव तालुक्यातील खडके, मडके, खामपिंपरी,पिंगेवाडी,प्रभुवडगाव,लख मापुरी,दहीगाव -शे, गदेवाडी,हातगाव ,मुंगी, कांबी,बोधेगाव, बालमटाकळी, गायकवाड जळगाव या गावांना शेतीसिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रत्येक उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात दिलासा मिळत असून चालू वर्षीच्या उन्हाळ्याने मोठा कहर केला असल्याने दररोजच्या वाढत्या उष्णतेमुळे तसेच चालू वर्षी विद्युत पंपाऐवजी सोलरच्या सतत होणाऱ्या उपशामुळे जमिनीत पाणीच राहिले नसल्याने निव्वळ पैठण उजवा कालव्यावर अवलंबून असणाऱ्या वरील सर्वच्या सर्व गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनत चालला असतानाच आता त्या तहानलेल्या ठिकाणी या सुटलेल्या पाणी आवर्तनाचा फायदा होणार आहे.चालू वर्षी या संपूर्ण कालव्याच्या दुरुस्तीचे काम जलसंपदा विभागाने हाती घेतले असल्याने होणारे ही काम जवळपास ५० ते ५५ वर्षांनंतर होत असल्याने कालवा आता नव्या स्वरूपाचा झाला असल्याचे दिसून येत आहे.

१३४ की मी च्या अंतराने गेलेला हा कालवा माजलगाव पर्यंत नेऊन तेथील असणाऱ्या जलाशयात झिरो करण्यात आला आहे.या कालव्यांतर्गत शेवगाव, गेवराई व माजलगाव या तीन तालुक्यासह इतरही अनेक इंडस्ट्रियल यरीयासाठी हा कालवा वरदान ठरत आहे.

























